# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७८/२०१०.

श्री. सुधाकर नारायणराव भिंगारे,
हनुमान मंदिराजवळ, धंतोली,
जि. वर्धा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संजय दैने,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. हिंगणघाट,
जि. वर्धा.

श्री. एम. टी. खाडीलकर,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
हिंगणघाट,
जि. वर्धा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.४.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगणघाट यांचेकडे वडीलांच्या नोकरीवर असण्याबाबत व आई वारसांन म्हणून प्रमाणपत्र देण्याबद्यल माहिती मागितलेली दिसून येते.  सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी सुनावणीचे दिवशी संपूर्ण माहिती मिळाली असून अपील मागे घेत असल्याचे तोंडी कबुली दिली आहे व राजनाम्यावर स्वाक्षरी केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५९/२०१०.**

श्री. विजय उमराव डोंगरवार,
वार्ड क्र. ३, पंचशील झेंडा चौक,
मु. पो. कटंगी कला, ता. जि. गोंदिया. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रदिप गोगुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, गोंदिया यांचेकडे ग्रामपंचायत, कटंगी कलाच्या संदर्भामध्ये सन २००६-०७, २००७-०८ व २००८-०९ यावर्षाचे ग्राम पंचायत कलम १४०(४) प्रमाणे पंचायत समितीने घेतलेल्या

निर्णयाचा अहवालाचे संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाणपत्रधारक आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २१.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दिनांक २१.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १९.१.२०१० रोजी देण्यात आला असून ग्रामपंचायत कटंगीकलाचे सन २००६-२००७, २००७-२००८, २००८-२००९ वर्षाचे लेखापरिक्षण झालेले नसल्याने पंचायत समिती गोंदियाने निर्णय घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की, मुंबई ग्राम पंचायत अधिनियमाप्रमाणे ग्रामपंचायत खर्चाचे संदर्भामध्ये लेखा परिक्षण करणे आवश्यक असते. परंतु ग्रामपंचायतचे लेखा परीक्षण हे नियमित होत नाही. त्यामुळे त्यांना सन २००६-०७, २००७-०८ व २००८-०९ या आर्थिक वर्षाचे ग्राम पंचायत कटंगी कलाचे फंडाचे लेखा परिक्षण संदर्भात तसेच पंचायत समिती गोंदिया अंतर्गत १०८ ग्रामपंचायतचे जमाखर्चाची माहिती मागितली आहे. परंतु अद्याप पर्यंत लेखा परीक्षण झाले नाही असे कळविण्यात आलेले आहे व जमा खर्चाचे संदर्भामध्ये पंचायत समितीकडे मान्यतेसाठी ज्या प्रती येतात त्या प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते परंतु तशी ती दिली नाही. जनमाहिती अधिकारी आज गैरहजर आहेत व त्यांचे तर्फे गटविकास अधिकारी यांनी स्वतःच माहिती दिली आहे. गट विकास अधिकारी यांनी सांगितले की, भारताची जनगणना २०११ मास्टर ट्रेनर यांचे तीन दिवसीय प्रशिक्षण दिनांक ७ ते ९ एप्रिल, २०१० या कालावधीत असल्यामुळे उपस्थित राहता येत नाही. कक्ष अधिकारी यांना महत्वाचे काम दिलेले असल्यामुळे ते आज हजर राहू शकले नाही. परंतु त्यांचे तर्फे माहिती ते स्वतः देत आहेत. गट विकास अधिकारी यांनी असे सांगितले की, ज्या ज्या ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षण झाले आहे ती त्यांना उपलब्ध करुन देता येईल. जी झालेली नाही ती त्यांना उपलब्ध करुन देता येणार नाही व तसे त्यांना कळविले आहे. १०८ ग्रामपंचायतीच्या जमा खर्चाचे संदर्भामध्ये पंचायत समितीकडे ज्या ग्रामपंचायतच्या संदर्भात माहिती उपलब्ध असेल ती माहिती त्यांना निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देता

येईल.  त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांच्याकडे कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ लेखी कळवून उपस्थित राहावे.

२) अपीलकर्ता उपस्थित झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सर्व संबंधित ग्रामपंचायतचे जमा खर्चाची कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी व त्यातून अपीलकर्ता यांनी ज्या ज्या आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घ्यावी.

३) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६२/२०१०, अपील क्रमांक १६३/२०१०, अपील क्रमांक १६४/२०१०, अपील क्रमांक १६५/२०१० व अपील क्रमांक १६६/२०१०.**

श्री. हेमंत दादुरामजी टेटे,
प्लॉट नं. ३५, स्वराज नगर,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७.

सौ. संध्या हेमंत टेटे,
प्लॉट नं. ३५, स्वराज नगर,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. .....
**अपीलकर्ता/अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण),
विभाग क्रमांक २, गणेश भवन, सिव्हील लाईन,
नागपूर.

श्री. जी. एस. राहाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण),
उपविभाग, हिंगणा, जि. नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये ५ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.४.२०१०

रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या पाचही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता/अपीलकर्ती हे गैरहजर असून त्यांचे तर्फे वकील, शुभा अ. झिंजरडे हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. यु. बी. चहांदे, उपकार्यकारी अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक १२.१०.२००९ रोजी, दिनांक ६.१०.२००९ रोजी, दिनांक ६.१०.२००९ रोजी, दिनांक २१.९.२०१० रोजी व दिनांक २२.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, हिंगणा उपविभाग, महावितरण, हिंगणा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) श्री. रमणलाल लखनलाल बिथले, रा. गेडाम ले आऊट, वानाडोंगरी यांचे घरगुती विज कनेक्शनबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. २) हिंगणा उपविभागांतर्गत येणाऱ्या वानाडोंगरी वितरण केंद्रातील जावज रजिस्टरच्या दिनांक १.१.२००८ ते दिनांक ३०.९.२००९ पर्यंतच्या प्रत्येक पानाची एक एक प्रत झेरॉक्स देण्यात यावी. ३) वानाडोंगरी वितरण केंद्रातर्फे सर्व प्रकारचे (डीएल/सीएल/एजी/आयपी/टेंपररी) विज कनेक्शन देते वेळी विज ग्राहकांच्या नांवापासून ते मिटर क्रमांक पर्यंत प्रथम ज्या रजिस्टरवर नोंद घेण्यात येते त्या कनेक्शन रजिस्टरच्या दिनांक १.१.२००८ ते दिनांक ३०.९.२००९ पर्यंतच्या प्रत्येक पानाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. ४) हिंगणा उपविभागांतर्गत कार्यरत अभियंतानी दिनांक १.१.२००९ ते ३१.३.२००९ पर्यंतच्या कालावधीत उपभोगलेल्या सुटीसंबंधी एकूण ३ मुद्यांवर मागितलेली दिसून येते. ५) श्री. हेमंत टेटे, कनिष्ठ अभियंता (निलंबित) वानाडोंगरी यांचेबाबत दिनांक २०.२.२००९ रोजी हिंगणा उपविभाग कार्यालयात घडलेल्या प्रसंगाबाबतची माहिती एकूण ६ मुद्यात मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना अनुक्रमे दिनांक ६.११.२००९ रोजी, दिनांक ६.११.२००९ रोजी, दिनांक ६.११.२००९ रोजी, दिनांक १६.११.२००९ रोजी व दिनांक ७.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अनुक्रमे दिनांक १८.११.२००९ रोजी ३ प्रथम अपीले व दिनांक ६.११.२००९ रोजी १ प्रथम अपील व अपीलकर्ती यांनी दिनांक १८.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेली आहेत. प्रथम अपीलाचा निर्णय हा अनुक्रमे दिनांक

५.१२.२००९ रोजी ४ अपीलांचा निर्णय व दिनांक ७.१२.२००९ रोजी देण्यांत आलेला दिसून येतो. परंतु निर्णय हा नोटशिटवर लिहिलेला असल्यामुळे व निर्णय नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे ५ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

३. अपीलकर्ता/अपीलकर्ती यांचे वकील यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती मिळाली ती अपूर्ण मिळाली आहे व जी कागदपत्रे मिळाली आहेत ती प्रमाणित करुन देण्यात आलेली नाही. अपील क्रमांक १६२/२०१० मधील दिनांक १२.१०.२००९ च्या अर्जातून मुद्या क्रमांक १ ची माहिती मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची जावक नोंदवही कनिष्ठ अभियंता यांचे कार्यालयामध्ये ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देता आली नाही व कव्हरिंग लेटर हे उपलब्ध झाले नाही त्यासंदर्भामध्ये प्रथम अपीलाचा आदेश झाल्यानंतर उपकार्यकारी अभियंता यांनी श्री. एच. डी. टेटे निलंबित यांचे वानाडोंगरी येथे कार्यालय असून कामात निष्काळजीपणा केल्याबद्यल चौकशी अहवाल दिनांक ६.३.२०१० रोजी सादर करण्यात आलेला आहे व त्या अहवालामध्ये कोणते रजिस्टर ठेवण्यात आले नाी व कोणते रजिस्टर ठेवण्यात आले याबद्यलचा तपशील देण्यात आलेला आहे. सदरच्या चौकशी अहवालाची प्रत ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व त्यातून त्यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध होऊ शकेल. तसेच दिनांक ६.१०.२००९ च्या अर्जातून माहिती सुध्दा त्यातूनच उपलब्ध होईल. अपील क्रमांक १६४/२०१० मध्ये दिनांक ६.१०.२००९ च्या अर्जात ईश्यु रजिस्टरची माहिती मागितलेली ाहे. परंतु तसे ईश्यू रजिस्टर ठेवण्यात येत नाही व ते एफ १ रजिस्टर ठेवण्यात येते व अधिकृत आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्याप्रमाणे नियमाप्रमाणे जे रजिस्टर ठेवण्यात येते त्याबद्यलची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. (प्रथम ईश्यु रजिस्टर) तशा प्रकारे त्यांना कळविणे सुध्दा संयुक्तिक राहिल. अपील क्रमांक १६५/२०१० मध्ये जी कार्यपध्दती आहे त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपील क्रमांक १६६/२०१० मधील मुद्या क्रमांक १ ते ५ ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही. मुद्या क्रमांक ६ च्या संदर्भामध्ये दिनांक २१.२.२००९ चा अर्ज हा सहसंचालक यांचे कार्यालयात दिलेला असल्यामुळे

त्याबद्यलची माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही असे त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १६२/२०१० हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे. अपील क्रमांक १६३/२०१० हे खारीज करण्यास पात्र आहे. अपील क्रमांक १६४/२०१० हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे. अपील क्रमांक १६५/२०१० हे खारीज करण्यास पात्र आहे व अपीलकर्ती यांचे अपील क्रमांक १६६/२०१० हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपील क्रमांक १६२/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून दिनांक ६.३.२०१० रोजी केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपील क्रमांक १६३/२०१०, अपील क्रमांक १६५/२०१०, अपील क्रमांक १६६/२०१० हे खारीज करण्यात येते.

३) अपील क्रमांक १६४/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना महावितरण कंपनीचे रजिस्टर ठेवण्यात येते त्याबद्यलची माहिती द्यावी तसेच प्राथमिक रजिस्टर ठेवण्यात येते किंवा नाही याबद्यल स्पष्टपणे कळविण्यात यावे.

४) वरील सर्व माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत देण्यात यावी. तसेच अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या छायांकित प्रती हया पुन्हा जनमाहिती अधिकारी यांचे कडून माहिती अधिकारात प्राप्त अशा प्रकारे प्रमाणित करुन घ्यावे.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३५/२०१० व अपील क्रमांक ३६०/२०१०.**

श्री. रमेश रंगलाल वासनिक,
इंदोरा मिशन मोहल्ला,
पो. बेझनबाग, नागपूर. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. नरेश चांगदेव साखरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
अमर स्मृती बहुउद्येशीय एज्युकेशन सोसायटी,
इंदोरा, मॉडेल टाऊन, बेझनबाग, नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक ८.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. बी. एस. सोमकुवर, वकील हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. नेताम, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, अमर स्मृती बहुउद्येशीय एज्युकेशन सोसायटी, नागपूर यांचेकडे १९९३ पासून आजपर्यंत सभा घेण्यात आल्या, ठराव पारित केले त्याची प्रमाणित प्रती देण्यात याव्यात. दर ३ वर्षांनी झालेल्या निवडणूकांच्या सविस्तर तपशील सहित प्रमाणित प्रत तात्काळ देण्यात यावी. १९९३ ते २००९ या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर्ड पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय ८ दिवसात माहिती द्यावी असा दिलेला असल्यामुळे व माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी सांगितले की, आता पर्यंत ते संस्थेचे उपाध्यक्ष असुन सुध्दा त्यांना कोणत्याही बैठकीस बोलाविण्यात येत नाही व कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्यात येत नाही व त्यामुळे त्यांनी ही माहिती मागणे भाग पडलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांचे वकील यांनी युक्तिवाद करतांना सचिव यांनी दिलेले उत्तर आयोगाचे निदर्शनास आणले. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, अपीलकर्ता हे संस्थेचे उपाध्यक्ष असून त्यांना सर्व माहिती आहे ते पुढील प्रमाणे. गेल्या १० वर्षापासून आपण संस्थेविरुध्द वर्तन (Activities) करीत असून खोटे व निराधार आरोप करुन तुमच्या वकीलातर्फे सतत मला नोटीसा पाठवितात. त्याच प्रमाणे संस्थेतर्फे चालविण्यात येणारी इंदिरा अमर स्मृति प्राथमिक शाळा, सुगतनगर, नागपूर या शाळेतील शिक्षक वर्ग व कारकून स्टॉफला गलिच्छ शिवीगाळ करता आणि स्त्री शिक्षिकांना बेकायदेशीररित्या उठविता. सदर शाळेत येऊन धिंगाना करता आणि शाळेत दहशद पसरविता. याबाबत तुमच्या विरुध्द अनेक तक्रारी शाळेतील कर्मचाऱ्यांनी जरीपटका, पोलीस स्टेशन, नागपूर येथे करण्यात आलेल्या आहेत हे सुध्दा आपणांस माहितच आहे. तसेच आपण संस्थेच्या ज्या पदावर आहात त्यापेक्षा आपण संस्थेचे सचिव असल्याचे लेखी स्वरुपात मला पाठविल्या वकीलाच्या नोटीसमध्ये लिहलेले आहे. माहितीच्या अधिकाराच्या कायद्यातील प्राविधानाचा दुरउपयोग करुन संस्था बंद पाडण्याच्या उद्येशाने व संस्थेचे अस्तीत्व नष्ट करण्याच्या हेतुने आपण वेळोवेळी प्रयत्न केलेले आहेत. असले अर्ज माझ्याकडे सादर करुन मला ब्लॅकमेल करण्याचा आपण अनेकदा प्रयत्न

केलेला आहे.  माहितीच्या अर्जात नमुद केलेली माहिती मिळवून संस्थेविरुध्द कारवाई करण्याच्या उद्येशाने व मोठी रक्कम माझ्याकडून उकळण्याचा तुमचा डाव असल्यामुळे आपणांस अर्जात नमुद केलेली माहिती देता येत नाही कृपया याची नोंद घेणे.  त्याचप्रमाणे आपण मागितलेली माहिती संस्थेच्या हिताविरुध्द असून संस्थेच्या दृष्टिकोनातून ती गोपनीय माहिती असल्यामुळे आपणांस देता येत नाही.  म्हणून आपण माझ्याकडे सादर केलेला दिनांक १०.१०.२००९ चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे याची सुध्दा आपण कटाक्षाने नोंद घ्यावी.  परंतु सचिव यांनी दिलेले उत्तर हे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अधिनियमाचे तरतुदीच्या निकषाप्रमाणे नसून सर्व साधारण अपीलकर्ता यांच्या वागण्याच्या प्रवृत्तीबद्यल दिले असून अपीलकर्ता यांना माहिती देता येणार नाही असे उत्तर दिलेले आहे.  परंतु अशा प्रकारे अधिनियमाचे तरतुदीच्या निकषाप्रमाणे माहिती न दिल्यामुळे किंवा उत्तर न दिल्यामुळे माहिती दिली नाही असे गृहीत धरावे लागते.  प्रथम अपीलीय अधिकारी यांना अधिकार नाही असे असून सुध्दा त्यांनी माहिती द्यावी असा आदेश दिलेला आहे व त्या आदेशाच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांचे वकील यांनी युक्तिवाद करतांना आक्षेप घेतला आहे.  प्रथम अपीलीय अधिकारी हे स्वतः संभ्रमात दिसून येतात.  त्यांच्या निर्णयामध्ये संस्थेच्या संदर्भातील माहितीच्या संदर्भात ते अपीलीय अधिकारी नाहीत.  हे ही विवेचनात म्हणतात व पुन्हा माहिती द्यावी असे आदेश देतात.  शिक्षणाधिकारी सारख्या अधिकाऱ्याने निश्चित निर्णय देणे आवश्यक आहे.

४.	प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णयाविरुध्द जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अपील क्रमांक ३६०/२०१० दाखल केलेले आहे व त्यामध्ये खालील प्रमाणे अपील मेमोमध्ये नमुद केले आहे.  The order of the First Appellate Authority itself speaks that he has no jurisdiction as the documents demanded by the aggrieved person admittedly relates to Charity Commissioner, Nagpur.  It also speaks that the said person Shri Ramesh Wasnik has also admitted that the information which hewants to seek from the Office of the Appallant's Institution/society relates to the office of the Charity Commissioner, Nagpur.  The learned First Appellate Authority in its impugned

order dated ६.१.२०१० also states the Shri R. R. Wasnik had to prefer First Appeal before the Second Appellate Authority and Education Officer (Primary) Zilla Parishad. Nagpur and thereafter he had to prefer and file his complaint/appeal before the Charity Commissioner, Nagpur. These submissions made by the information seeking persons Shri R. R. Wasnik also show that he wants to prefer first Appeal before this First Appeal Authority and thereafter he had to move before the Charity Commissioner, Nagpur for his grievance. It also shows that the submissions made by the agrieved person Shri Ramesh R. Wasnik before the First Appellate Authority that he wants to misuse the provisions of law and abused the process of law as there is no such provisions in the Right to Information Act, २००५ hence the impugned order passed by the learned First Appellate Authority dated ६.१.२०१० is liable to be quashed and set aside. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे व जनमाहिती अधिकारी यांनी माहिती कां देण्यात येऊ नये याबद्यल अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे आयोगापुढे सांगता आलेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १०.१०.२००९ च्या अर्जात मागितलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी तथा सचिव हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५५/२०१०.

श्री. भगवान बापू निंबवाले,
१९, अभयनगर रोड, न्यु शिवाजी नगर,
गल्ली नं. २, रामेश्वरी रिंग रोड,
नागपूर - ४४० ०२४. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ठाकूर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
धनवटे चेंबर्स अनेक्स, सिताबर्डी,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
सहकार सदन, हिंदुस्थान कॉलनी,
अमरावती रोड, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. पंकज वानखेडे, सहाय्यक निबंधक हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपुर यांचेकडे चिटणविसपूरा सहकारी बँक मर्यादित, नागपूर च्या पात्र तज्ञ संचालकाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.१०.२००९ रोजी निवडणुक निर्णय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १.१.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य महिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली परंतु ती विलंबाने मिळाली. तसे त्यांनी त्यांच्या दिनांक ३०.७.२००९ च्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही निवडणुक निर्णय अधिकारी यांचेकडे असल्यामुळे अपीलकर्ता यांचा अर्ज हा दिनांक १७.९.२००९ रोजी निवडणुक निर्णय अधिकारी, चिटणविसपुरा सहकारी बँक मर्यादित, नागपूर यांना हस्तांतर केला व अपीलकर्ता यांना दिनांक १४.१०.२००९ रोजी माहिती दिली. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना चिटणविसपुरा सहकारी बँक मर्यादित उपविधीची प्रत मिळाली नाही. अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही माहितीच्या अधिकारात मागितली नव्हती असे आयोगाचे निदर्शनास आणले त्यामुळे ती माहिती त्यांना अपील करुन ही मिळाली नाही. माहितीच्या अधिकारात यांचा अ प्रपत्रात सुध्दा सदरचा अर्ज दिलेला नव्हता त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य आहे असे असले तरी अपीलकर्ता यांना चिटणविसपुरा सहकारी बँक मर्यादित उपविधी २१(३) ची सत्यप्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. परंतु माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६/२०१०.**

श्री. विकास गणपतराव शेंडे,
नागरी बँक कॉलनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे,
हिंदनगर, वर्धा - ४४२ ००२. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. दिगंबर मेहर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. दिगंबर मेहर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक (प्र.)
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे नगर रचना नियमाचे पालन होत नाही. कर्तव्यात अधिकारी कसूर/गैरव्यवहार व सोबत एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.१.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ४.२.२०१० रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते.

३.	अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी मोघम माहिती मागितलेली असून निश्चित प्रकारची माहिती मागितलेली नाही त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य दिसून येते. विलंबाबाबत निश्चित माहिती अधिकाऱ्यांकडे माहिती न मागता ती आयुक्त, महानगरपालिका अशी मागितलेली असल्यामुळे विलंब झाला असल्याने ३० दिवसांत अपेक्षित करता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६८/२०१०.**

श्री. अब्दुल रफिक उर्फ मुन्ना रफिक,
क्वार्टर नं. ५/८२, राजे रघुजीनगर,
नागपूर - ४४० ०२४. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र. कुलगुरु,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ,
नागपूर.

श्री. सुभाष बेलसरे,
जनमाहिती अधिकारी तथा
कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ,
नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.४.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरचा अर्ज दिनांक २७.२.२००९ रोजी माहिती अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे हस्तांतर करण्यात आलेला दिसून येतो व तसेच अपीलकर्ता यांना सुध्दा दिनांक ७.३.२००९ रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.४.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २५.६.२००९ रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे व त्यामुळे समाधानप न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, मुद्या क्रमांक १ ची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्या विद्या शाखेमध्ये हजेरी बुक उपलब्ध असते. याचा अर्थ जनमाहिती अधिकारी यांनी त्या विद्या शाखेतून ते हजेरी बुक उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तसेच डॉ. निर्मल कुमार सिंग यांची पदवी त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्यांना विचारणा करण्यात आली होती. परंतु त्यांनी आक्षेप घेतल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. आज डॉ. निर्मल कुमार सिंग हे आयोगापुढे हजर आहेत व त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपीलकर्ता कोण आहेत यांची त्यांना माहिती नाही व त्या पदवी संबंधी काय उपयोग करणार आहेत हेही त्यांनी सांगितले व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देऊ नये असे कुलसचिव यांना सांगितले होते. परंतु विद्यापीठात पदवी ही सार्वजनिक अभिलेख्याचा भाग होत असल्यामुळे त्याची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत घेण्यात येणार नाही. त्यामुळे छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. डॉ. करडे समिती संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे जवळ कोणत्याही प्रकारचा पुरावा नाही वइतर माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १३.२.२००९ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये संबंधित विद्या शाखेतून हजेरी बुक उपलब्ध करुन घेऊन छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात यावीत. तसेच डॉ. निर्मल कुमार सिंग यांनी घेतलेली आचार्य पदवीची छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२२/२०१०.**

श्री. तुषार धनंजय मंडलेकर,
२०, एनआयटी कॉम्प्लेक्स, हिल रोड,
गांधीनगर, नागपूर - ४४० ०१०. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. स. बा. सहस्त्रबुध्दे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह परिवहन आयुक्त,
प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,
वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.

श्री. अ. ना. भालचंद्र,
जनमाहिती अधिकारी तथा
उप परिवहन आयुक्त, (अंमल-१)
प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,
वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडे दिनांक १.१.२००१ ते २४.७.२००९ या कालावधील एकूण ११ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी सदरची माहिती पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.८.२००९ रोजी अपीलकर्ता यांना आपणांस हव्या असलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठी असल्याने सदर माहिती पुरविण्याकरिता सदर माहिती पुरविण्यासाठीच्या अंतिम दिनांकानंतर (दिनांक २२.८.२००९ नंतर) १५ दिवस म्हणजेच दिनांक ८ सप्टेंबर २००९ पर्यंत सदर माहिती पुरविण्यासाठीचा कालावधी कृपया वाढवून देण्यात यावा असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.१.२०१० रोजी देण्यात आलेला असून सुनावणी दरम्यान अपीलकर्ते उपस्थित नसल्याने माहिती अधिकाऱ्यांचे दिनांक २०.८.२००९ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाले अथवा नाही याविषयी खातरजमा करता येत नाही. तथापि सदर पत्राची प्रत नमुद केल्याप्रमाणे या आदेशा सोबत जोडण्यात आली आहे. अपीलकर्त्यांनी त्यात नमुद केल्याप्रमाणे शुल्काचा भरणा केल्यानंतर जनमाहिती अधिकारी तथा परिवहन उप आयुक्त (अंमल-१) यांनी सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती ताबडतोब उपलब्ध करुन द्याव्यात असे याद्वारे आदेशित करण्यात येत आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद केला की, जनमाहिती अधिकारी यांनी मुदत वाढवून देण्याचे पत्र दिले आहे. परंतु अधिनियमात तशी तरतुद नाही. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानंतर अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्याकरिता त्यांना कळविले. याचा अर्थ अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्याचे पत्र हे विहित मुदतीत दिलेले नाही व ते मला प्राप्त झालेले नाही व त्यामुळे माहिती ही अधिनियमाचे कलम ७ पोट कलम ६ प्रमाणे मोफत उपलब्ध व्हावी. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही वर्तमानपत्रातील बातमीच्या आधारावर मोघम अशी असून त्यात माहितीची व्याप्ती बरीच मोठी आहे. त्यामुळे सदरची माहिती संकलीत करणे हे ३० दिवसाचे आंत शक्य नसून त्यांनी मुदत वाढीची विनंती केली होती. असे

असले तरी दिनांक २०.८.२००९ रोजी म्हणजे विहित मुदतीतच अपीलकर्ता यांना अभिलेख खर्चाचा भरणा करण्याकरिता कळविण्यात आले. तसेच मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये सुध्दा मुद्दे निहाय उत्तर देण्यात आलेले होते. अपीलकर्ता यांचा अर्ज दिनांक २४.७.२००९ रोजी देण्यात आला असून दिनांक २४.८.२००९ ही माहिती उपलब्ध करुन देण्याची अंतीम तारीख होती. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २४.८.२००९ रोजी युपीसीने पत्र दिले आहे. सदरचे पत्र हे अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेले नाही असे त्यांनी सांगितले. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी सदरचे पत्र निर्गमित करण्याचा पुरावा आयोगापुढे सादर केलेला आहे व त्यामुळे पत्र निर्गमित केलेले आहे हे सिध्द होते. मात्र अपीलकर्ता यांनी सुध्दा प्रथम अपील हे मुदतीच्या नंतर दाखल केले. असे असले तरी प्रथम अपीलाचा निर्णय दिला असल्यामुळे सदरचा मुद्दा हा विचारात घेतला जात नाही. जनमाहिती अधिकारी यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्याचे पत्र जरी दिनांक २०.८.२००९ असे असले तरी ते पोस्टात मात्र दिनांक २४.८.२००९ रोजी टाकण्यात आलेले आहे. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असे निष्पन्न होत नाही. परंतु माहिती ही मुदतीत उपलब्ध करुन देणे हे आवश्यक असते व अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्याचे पत्र सुध्दा विहित मुदतीतच पाठविणे आवश्यक असते. अधिनियमाचे कलम ७(३) प्रमाणे "माहिती देण्याचा खर्च दर्शविणारी कोणतीही जादा फी प्रदान केल्यावर माहिती देण्याचा निर्णय घेण्यात आला असेल त्याबाबतीत जनमाहिती अधिकारी विनंती करणाऱ्या व्यक्तिस... (क) पोटकलम (१) अन्वये विहित केलेल्या फीनुसार ही जादा रक्कम त्यांने कशाच्या आधारावर ठरवली त्या हिशोबासह माहिती पुरविण्याचा त्याने निर्धारित केलेला खर्च दर्शविणारा जादा फीचा तपशील नमुद करणारी सुचना पाठविल व त्याद्वारे तिला ती फी भरण्याचर विनंती क रील आणि उक्त सुचना पाठविल्याच्या व फीचे प्रदान केल्याच्या दरम्यानचा कालावधी हा त्या पोटकलमामध्ये विर्निदिष्ट केलेल्या ३० दिवसाच्या कालावधीची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ वगळण्यात येईल." या तरतुदीप्रमाणे दिनांक २०.८.२००९ चे पत्र दिनांक २४.८.२००९ रोजी पाठविले. सदरच्या पत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये संपूर्ण विवरण दिलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक २४.८.२००९ रोजी जे पत्र पाठविले त्या दिवसापासून तर खर्चाचा भरणा करे पर्यंतचा वगळून उर्वरित कालावधीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. परंतु अपीलकर्ता यांना अतिरिक्त खर्चाचे पत्र मिळाले नाही व त्यामुळे खर्चाचा भरणा केलेला नाही. तसेच विलंबाने ते पत्र दिले आहे. त्यामुळे माहिती मोफत मिळावी अशी आयोगाकडे विनंती

केली. अपीलकर्ता यांना मुदत वाढीचे पत्र मिळते, प्रथम अपीलाचे सुनावणीचे पत्र मिळते, राज्य माहिती आयोगाने युपीसीने पाठविलेले पत्र सुध्दा मिळाते. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा करावयाचे पत्र मात्र मिळत नाही. हे म्हणणे योग्य वाटत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा करण्याचे पत्र मिळाले नाही हे त्यांचे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती ही संकलीत करावयाची असल्यामुळे व मोघम मागितली असल्यामुळे निश्चित पृष्ठे किती होतील हे तातडीने सांगता येणे शक्य नव्हते. त्यामुळे खर्चाचा भरणा करावयाचे पत्र हे सर्व पृष्ठे संकलीत झाल्यानंतरच उपलब्ध करणे योग्य ठरले असते. त्यानंतरच जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.८.२००९ च्या पत्रावर सही केली आहे. सदरच्या पत्राची प्रत जनसंपर्क अधिकारी यांना सुध्दा अग्रेषित केलेली दिसून येते व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात टाळाटाळ होत आहे किंवा टाळाटाळ केलेली आहे असे आयोगास वाटत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आज ही माहिती त्यांचेकडे तयार आहे व ती ९०० पृष्ठामध्ये सादर आहे असे आयोगापुढे सांगितले व त्यामुळे अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतरच माहिती उपलब्ध करुन देता येईल असे पुन्हा आयोगापुढे सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी पुढे असे ही सांगितले की, ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देणे शक्य व्हावे याकरिता माहितीचे वर्णन करणे आवश्यक असते व हे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे संयुक्तिक वाटते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा केल्यानंतरच माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत दिनांक २०.८.२००९ च्या पत्राप्रमाणे अतिरिक्त खर्चाचा भरणा केल्यानंतरच त्यांना माहिती पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२६/२०१०.**

श्री. मुरलीधर हरबाजी गायकवाड,
मु. पो. शिवणी, ता. सिंदेवाही,
जि. चंद्रपूर. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, सिंदेवाही,
जि. चंद्रपूर.

श्री. एस. डी. वाकडे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शिवणी,
ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. डी. एस. सावसाकडे, विस्तार अधिकारी (पंचायत) हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शिवणी यांचेकडे हरीयाली सामाजिक वनीकरण विभाग योजनेअंतर्गत तयार बंधारे बांधकामाची चौकशी बाबत व सामाजिक वनीकरण हरीयाली विभाग योजनेचे जमा खर्च व बिलाचे रेकॉर्ड कागदपत्रे प्रत्यक्ष तपासु इच्छितो याबाबत एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.१०.२००९ रोजी हरीयाली मृदसंधारणाबाबत आपण माहितीच्या अधिकारात मागितलेल्या माहिती संबंधाने संपूर्ण रेकार्ड तपासणीकरिता पंचायत समिती, सिंदेवाहीला दिलेला असल्याने आपणास उपरोक्त विषयासंबंधी माहिती देता आली नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक २०.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ६.११.२००९ रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांनी १० दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे सुध्दा माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता गैरहजर आहेत परंतु जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत व त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असे सांगितले. परंतु त्याबाबत आयोगाकडे कोणत्याही प्रकारचा पुरावा दाखल केलेला नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आयोगाची दिशाभूल केलेली दिसून येते व त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये १०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसूली त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करण्यात येऊन ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली असे आयोगास सांगितले. परंतु पुरावा सादर केला नाही त्यामुळे त्यांचे विरुध्द सुध्दा प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२४/२०१०.

श्री. अरुण अमृत गवई,
सी. पी. डब्ल्यु क्वार्टर -२७,
सिव्हील लाईन, नागपूर. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
अकोला.

श्री. एस. एस. गरकल,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
अकोला. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, अकोला यांचेकडे एकूण १७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.१२.२००९ रोजी एकूण २१८/- रुपये या कार्यालयात अदा करावी असे

कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतर दिनांक २२.१२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.३.२०१० रोजी दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, मुद्या क्रमांक १ मध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे गाव नमुना ७ मध्ये नांव असलेल्या व्यक्ति व्यतिरिक्त ज्या कोणी शेतवहिती करीत असल्यास ७ ब चे प्रकरण पाठवावे लागते असे कळविलेले आहे व त्याबाबतच अपीलकर्ता यांना कोणत्या आधारावर ७ ब ची नोंद केली आहे याची माहिती पाहिजे आहे. परंतु त्यांना आता पर्यंत तलाठी यांनी कोणत्याही प्रकारच्या आधारावर माहिती दिली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, पिकपेऱ्याची पाहणी तलाठी करतो व पाहणी करिता गेलेल्या वहीवाटीशी संबंधित दिसून येते. त्याप्रमाणे आता नोंद घेतती व तसे प्रकरण पाठविले. त्याप्रमाणे आदेश व कागदपत्रे असतील असे नाही व ते उपलब्ध नाही. त्यामुळे तशी माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांना स्पष्टपणे नियमाचे माहितीची प्रत देणे संयुक्तिक राहिल किंवा त्याप्रमाणे कोणत्या पध्दतीची कार्य पध्दती अवलंबिली ती दिसून येत नाही असे कळविणे संयुक्ति राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ३०.११.२००९ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये व मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात दिलेल्या उत्तराचे संदर्भामध्ये वहीवाटीची नोंद घेतल्या प्रकरणी फी कोणत्या आधारावर घेतली त्याबाबतची माहिती उपलब्ध असल्यास किंवा तलाठी यांनी पिकपेरे करतांना नियमाप्रमाणे कार्यवाही पध्दत अवलंबिली किंवा नाही ही बाब स्पष्टपणे कळविण्यात यावी. सदरची माहिती त्यांना रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२५/२०१०.**

सौ. दुर्गा तुकाराम पुडके,
चिखली वस्ती, गजानन मंदीर जवळ,
कळमना मार्केट, नागपूर. .....
**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क्रमांक -२,
नागपूर.

श्री. जे. एम. बेंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर भुमापन अधिकारी क्रमांक -२,
नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक ४.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा भुमापन अधिकारी क्र. १, नागपूर नंतर क्रमांक २ यांचेकडे मौजा पारडी ख.नं. १/१, ३/१, ४, ५, ६, ८/२ भुखंड क्रमांक ६३३ मध्ये वारसदार दर्शविण्यासंबंधी सादर केलेल्या दस्ताऐवजाची सत्यप्रत मिळण्याबाबत. माहिती स्वतः हजर राहून घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक

३०.९.२००९ रोजी आपण मागितलेल्या माहितीचे अर्जामध्ये कोणी सादर केली त्याबाबत अर्जदाराचे नांव, दाखल दिनांक, अर्जाची पोच पावती नसल्यामुळे सदर प्रकरणाचा शोध घेणे शक्य नाही. कृपया आपण सदर बाबी नोंदवून अर्ज सादर करावा. तद्नंतर आपणास आवश्यक असलेली माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ९.११.२००९ रोजी अपीलकर्ती यांनी तपशीलात माहिती पुरविलेली दिसून येते व दिनांक २५.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिला नसल्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ती यांना जी माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे पुरविली त्यामध्ये श्री. शंकर उदरुजी पुडके हे मय्यत झाले मृत्युचे प्रमाणपत्र व प्रतिज्ञापत्र क्रमांक २४० दाखल झाले आहे असे दिसून येते. परंतु प्रतिज्ञा पत्राची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. परंतु सदरचे प्रतिज्ञापत्र हे नगर भुमापन अधिकारी क्रमांक २, नागपूर यांचेकडील दिसून येते. त्यामुळे त्याबद्यलची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. माहिती उपलब्ध झाल्यावर अपीलकर्ता यांनी अधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे वारसाचे संदर्भात तक्रार अपील सादर करुन निर्णय मिळवून घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत वारसाचे संदर्भाचे कागदपत्रे प्रतिज्ञा पत्र असल्यास त्याची प्रत ही उपलब्ध करुन घेऊन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२७/२०१० व अपील क्रमांक २२८/२०१०.**

श्री. राजेंद्र तानबाजी सतई,
साई प्रसाद ६९, महालक्ष्मीनगर नं. ३,
गल्ली नं. ३, मानेवाडा रोड, नागपूर - ४४० ०२४. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. बी. उकेश,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरिक्षण),
कॅफे हाऊस, गोकुलपेठ, नागपूर.

श्री. वाय. एस. बागडे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा विशेष लेखा परिक्षक श्रेणी -१,
सहकारी संस्था, गणेशपेठ, नागपूर.

श्री. राजेश भुसारी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,
धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर.

श्री. जे. के. ठाकूर,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था,
धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक

९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक २२७/२०१० मध्ये दिनांक ३.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा विशेष लेखा परिक्षक, श्रेणी -१ सहकारी संस्था, गणेशपेठ, नागपूर यांचेकडे नागपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित, नागपूर जिल्हा या संस्थेचे सन २००६-२००७ अंकेक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवालाची प्रत मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.१.२०१० रोजी मा. मुंबई हायकोर्ट, औरंगाबाद खंडपीठच्या रिट पिटिशन नं. १३०४ सन २००८ बाबत दिनांक १७.२.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार संस्थेचा सन २००६-०७ च्या अंकेक्षण अहवालाची प्रत देता येत नाही. असे कळविलेले दिसून येते. तसेच सदर वर्षाचे लेखापरिक्षक सनदी लेखापाल यांनी केले असल्यामुळे या कार्यालयाकडे कार्यवाहीची कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध नाहीत असे कळविलेले दिसून यते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केला. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठच्या रिट पिटिशन नं. १३०४/२००८ च्या निर्णयाचे अवलोकन केले असता मा.उच्च न्यायालयाने आयुक्त, सहकार यांना दिलेल्या आदेशामध्ये त्यांनी ताळेबंद किंवा नफातोटा पत्रकाशिवाय कोणतीही माहिती सहकारी संस्था, नागरी बँका, पतसंस्था सर्व साधारण जनतेला उपलब्ध करुन देण्यात येऊ नये अशा प्रकारे आदेश दिलेले असल्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक २२८/२०१० मध्ये दिनांक २०.१०.२०१० रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, सिताबर्डी, नागपूर यांचेकडे नागपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित, नागपूर जिल्हा नेहरुनगर नंदनवन यांची

एकूण ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे या कारणास्तव माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपातील असल्यामुळे ती फेटाळण्यात आलेली आहे असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी कार्यवाहीच्या संदर्भात माहिती विचारली होती व शासनाने वसुलीच्या प्रक्रियेवर दिलेल्या स्थगनादेश आहे व स्थगनादेशामुळे पुढील कार्यवाही करता आली नाही. शासन स्थगनादेश असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्याबाबतची सुध्दा माहिती उपलब्ध करुन देता येत नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २२७/२०१० व अपील क्रमांक २२८/२०१० हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२३/२०१०.

श्री. अमर ताराचंद तिरपुडे,
मु. टेकेपार (माडगी) पो. गुन्थारा,ता. जि. भंडारा.
**..... अपीलकर्ता**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,भंडारा.

श्री. अशोक शिवरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,भंडारा.
**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, भंडारा यांचेकडे टेकेपार ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या बीपीएल व अंतोदयी शिधापत्रिकाची २००२ ते आजपर्यंतची यादी मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.     जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या अर्जावर संबंधित लिपिक श्री. बी. एस. पेंदाम, अव्वल कारकून यांनी कोणत्याच प्रकारची कार्यवाही न केल्यामुळे अर्जदारास कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तसेच सदर उत्तराबाबत विचारपुस केली असता सदर नस्ती हरवली असल्याचे सांगितले. त्यांनी संबंधित लिपिक श्री. बी. एस. पेंदाम, अव्वल कारकून यांना हया कार्यालयाचे पत्र क्र. कली/आस्था/कावि/२११/१०, दिनांक ८.४.२०१० अन्वये कारणे दाखवा नोटीस दिलेले असून २४ तासाचे आंत लेखी स्पष्टीकरण मागितले आहे. उपविभागीय अधिकारी, भंडारा हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्यामुळे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल करावयास पाहिजे होते व त्याप्रमाणे त्यांनी केले नाही. परंतु त्याबाबतही लिपिक यांनी कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. यावरुन लिपीक श्री. बी. एस. पेंदाम, अव्वल कारकून हे सदरच्या प्रकरणी दोषी आढळून येतात. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) श्री. बी. एस. पेंदाम, अव्वल कारकून यांनी अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे व नस्ती गहाळ केली असल्यामुळे व दाखल झालेले प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा तहसीलदार यांचे आदेश पाळले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये १०००/- शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली त्यांच्या दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२१/२०१०.

श्री. रामकृष्ण कमलाकर मोहरील,
ग्रीन रेसीडेन्सी कॉलनी, पाटील नगर,
वर्धा. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
बुलढाणा अर्बन को-ऑप.सोसायटी लिमिटेड,
सहकार सेतु, हुतात्मा गोरे पथ, बुलढाणा - ४४३ ००१.

जनमाहिती अधिकारी तथा
बुलढाणा अर्बन को-ऑप.सोसायटी लिमिटेड,
लोकमान्य बापूजी अणे मार्ग, जैन मंदीराजवळ,
रामदास पेठ, नागपूर - ४४० ०१०. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी तर्फे श्री. जितेंद्र कोठारी, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी बुलढाणा अर्बन को-ऑप. सोसायटी लिमिटेड, नागपूर यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे

अनुषंगाने बुलढाणा अर्बन को-ऑप.सोसा.लि. ने संस्था ही शासकीय मदत घेत नाही. त्यामुळे माहिती देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. संस्थेतर्फे वकील हजर आहेत व त्यांनी आयोगाकडे असे सांगितले की, उत्तरवादी संस्था ही मल्टी स्टेट को-ऑप.सोसासटी ॲक्ट २००२ प्रमाणे पंजीबध्द असून, तिचे मुख्य कार्यालय बुलढाणा येथे आहे. तसेच सहकारी संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी कोणत्या लागू आहेत याबाबत स्वयंस्पष्ट खुलासा अधिनियमात असून, त्याबाबत मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर यांचे निर्णयाप्रमाणे लागू होत नसल्यामुळे तसेच आंध्रप्रदेश उच्च न्यायालय, केरळ उच्च न्यायालय व अलाहाबाद उच्च न्यायालय या न्यायालयांनी पारित केलेल्या निवाडयामध्ये शिक्का मोर्तब केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. तसे अपीलकर्ता यांना दिनांक १५.२.२०१० रोजी सुध्दा कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२९/२०१० व अपील क्रमांक २३०/२०१०.**

श्री. कमलाकर केशव आस्कर,
३४, शिवसाधना अपार्टमेंट,
समर्थ नगर (पश्चिम),
नागपूर - ४४० ०१५. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२.

जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण),
शिक्षण संचालनालय,
मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१.

श्री. अ. धों. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी,
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपील क्रमांक २२९/२०१० मध्ये उपसचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी तसेच कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी हे आज उपस्थित नाहीत व त्यांनी आयोगाकडे विनंती केलेली आहे. अपील क्रमांक २३०/२०१० मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. डॉ. ए. जी. देशमुख, सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर हे हजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक २२९/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक १९.९.१९९१ ते ११.१२.१९९९ दरम्यान नियुक्त बिगर नेट/सेट प्राध्यापकांच्या वरिष्ठ निवड श्रेणी लाभाकरिता त्यांच्या सेवा खालील भिन्न प्रकरणांमध्ये कोणत्या तारखेपासून ग्राहय धरल्या जातील (अ) सदर प्राध्यापक डिसेंबर, २००३ पूर्वी नेट/सेट उत्तीर्ण झाले तर किंवा (ब) सदर प्राध्यापक डिसेंबर, २००३ नंतर नेट/सेट उत्तीर्ण झाले असतील तर किंवा (क) सदर प्राध्यापक त्यांच्या निवृत्तीपर्यंत नेट/सेट अनुतिर्णच राहिले तर वरील तिन्ही अ, ब, क मुद्यांवर (संबंधित शासन निर्णयासह) स्पष्ट माहिती द्यावी. हीच माहिती त्यांनी अपील क्रमांक २३०/२०१० मध्ये राज्य जनमाहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांचेकडे दिनांक २९.१०.२००९ च्या अर्जाप्रमाणे मागितली. त्याप्रमाणे अनुक्रमे अपीलकर्ता यांना दिनांक १०.११.२००९ व दिनांक ११.११.२००९ रोजी संबंधित शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ३०.११.२००९ रोजी व दिनांक

१९.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र दुसऱ्या प्रथम अपीलामध्ये दिनांक १६.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना अपीलात गैरहजर असल्यामुळे सदर अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, या शासन निर्णयाच्या प्रती सोबत ३ प्रश्नाची उत्तरे मागितली होती. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना शासन निर्णयाची प्रत दिलेली आहे. परंतु त्यांची प्रश्न उत्तरे ही अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरची दोनही अपीले खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९९/२०१०.

श्री. सत्यवान गंगारामजी उपरे,
भांडेवाडी, पारडी, (उपरे मोहल्ला)
भंडारा रोड, नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. गणेश मस्कराम राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
लकडगंज झोन क्रमांक ८,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. मोती गगणदास कुकरेजा,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, लोककर्म विभाग,
लकडगंज झोन क्रमांक ८,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी (प्राप्त दिनांक २३.९.२००९) जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, वार्ड अधिकारी, लकडगंज झोन क्रमांक ८, नागपूर

महानगरपालिका, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) मा.उच्च न्यायालयांचे आदेशात माझे घर तोडण्यात यावे अशी नोंद कां नाही. २) मा.उच्च न्यायालयाचे आदेशात उपरे मोहल्लंच्या नाल्याची नोंद कां नाही. ३) मा. उच्च न्यायालयाचे आदेशात माझ्या नावाची नोंद नसतांना माझे घर कां तोडण्यात आले. ४) आपल्या आदेशात अनधिकृत बांधकाम तोडण्यात यावे असे नमुद कां केले नाही. ५) माहितीच्या अधिकारांतर्गत आपण दिलेली माहिती माझ्याशी संबंधित कां नाही. ६) मी मागितलेली माहिती कां पुरविण्यात आलेली नाही. ७) मा. उच्च न्यायालयांच्या आदेशात आपण माझे घर तोडण्यात यावे अशा आदेशाची प्रत देणे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ८.१०.२००९ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.११.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते असा निर्णय दिलेला आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. परंतु त्याचे घर तोडण्याचे संदर्भात कोणताही आदेश नसतांना तोडण्यात आले आहे. याचा अर्थ अपीलकर्ता यांना कार्यवाही अपेक्षित आहे. परंतु माहितीचा अधिकारात कागदपत्रे उपलब्ध होतात. गुणवत्तेच्या संदर्भात तपासणी करता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९७/२०१०.

श्री. राधेश्याम परसरामजी काबरा,
शिवाजी वार्ड,
मु. पो. ता. देसाईगंज,
जि. गडचिरोली - ४४१ २०७. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. के. सांबरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख,
गडचिरोली.

श्री. प्र. क. निकुरे,
जनमाहिती अधिकारी तथा
वरिष्ठ लिपिक,
अधिक्षक, भूमी अभिलेख,
गडचिरोली. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, भूमी अभिलेख, गडचिरोली यांचेकडे अर्जदाराने दाखल केलेले जोडपत्र अ जोडपत्र ब तक्रार अर्ज लोकशाही दिनातील अर्जा संबंधाने दिनांक २२.५.२००१ ते २५.९.२००९ या कालावधीतील दिलेल्या अर्जाचे संबंधात झालेल्या कार्यवाहीची माहिती एकूण १० मुद्यांवर मागितलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांना दिनांक ७.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली होती. ती अपूर्ण असल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २१.१२.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना उपलब्ध करावयाची माहिती समक्ष समजावून सांगितली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु सदरच्या निर्णयाप्रमाणे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता यांच्या अपील मेमोचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांना माहिती अपूर्ण दिली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर त्यांनी दिनांक ७.१०.२००९ रोजी उपलब्ध करुन दिलेल्या उत्तराचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांचे म्हणणे खरे आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी एकूण १० मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्या मुद्यावरील अर्जात नमुद केलेल्या उत्तरावर कोणत्या प्रकारची कार्यवाही झाली आहे अशा प्रकारची माहिती त्यांनी मागितलेली असल्यामुळे कार्यवाही करतांना कलम १०६ खाली चौकशी काय केली आहे याची माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. मुद्या क्रमांक ७ ते ९ मध्ये कोणत्याही प्रकारचे प्रश्न नाही व त्यामुळे त्या अर्जाचे वाचन केले नाही असे दिसून येते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ता यांच्या अर्जाचे वाचन करुन व माहिती अधिकारी यांनी काय माहिती दिली याचा निर्णय घेणे आवश्यक असते व त्याप्रमाणे अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक २५.९.२००९ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ ते १० मधील मुद्येनिहाय माहिती कागदपत्रे उपलब्ध असल्यास ज्या स्वरुपात असतील त्याप्रमाणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५०/- शास्ती लादण्यात येते. त्याबद्यल त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. त्याबद्यल त्यांना कोणत्याही प्रकारचे समाधानकारक उत्तर देता आले नाही. त्यामुळे सदरची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द सुध्दा प्रशासकीय कार्यवाही करावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९८/२०१०.

श्री. गुलाब कान्हू बन्सोड,
२१८, विनाबा नगर, ता. तुमसर,
जि. भंडारा. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. कृष्णमोहन,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
नागपूर वनवृत्त, सिव्हील लाईन,
नागपूर.

श्री. एस. व्ही. अल्लुलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (नियोजन),
नागपूर वनवृत्त, सिव्हील लाईन,
नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक १३.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन) नागपूर वनवृत्त, नागपूर यांचेकडे श्री. यशविरसिंग, उपवनसंरक्षक, भंडारा वन विभाग, भंडारा यांची वैयक्तिक माहिती १) मुळ सेवा पुस्तिकेतील पहिल्या पानाची साक्षांकित प्रत. २) सन २००६ ते एप्रिल २००९ पर्यंत सादर केलेल्या चल अचल व स्थावर मालमत्तेचे विवरणाच्या प्रती. ३) शिस्तभंग कार्यवाही वा विभागीय चौकशी सुरु असल्याबाबत/नसल्याबाबतची माहिती संपूर्ण विवरणासहीत पत्राच्या प्रती पुरविणे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.७.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २१.७.२००९ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती कृपया शासन स्तरावरुन किंवा प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर या कार्यालयातून घेण्यात यावे असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असे दिसून येते. माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयात असेल त्या कार्यालयात ती मागावी ३० दिवसामध्ये उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरची माहिती शासन स्तरावर मागणे आवश्यक होते. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २००/२०१०.

श्री. अभिमन पांडुरंग डहाके,
रा. खोकरला, पो. गोन्हा,
ता. कुही, जि. नागपूर. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
ता. उमरेड, जि. नागपूर.

श्री. पालांदूरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
ठाणेदार,
पोलीस स्टेशन, वेलतूर,
ता. कुही, जि. नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा इनिस्पेक्टर, पोलीस स्टेशन, वेलतूर, ता. कुही, जि. नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

यातील अर्जदार अभिमन डहाके, सामाजिक कार्यकर्ता हा घटनेच्या दिवशी रात्री ९:०० वाजतेच्या दरम्यान लहान भावाचा मुलगा निखील यास घराकडे नेऊन देत असतांना गैरअर्जदार राजेश खराबे गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीने सुडाच्या भावनेतून रस्त्यात अडवून अश्लील शिव्यागाळ, जिवे मारण्याची धमकी, हातापायी करण्याचा प्रयत्न करुन कडेवरील ३ वर्षाच्या निखीलला जबरदस्तीने हिसकावून त्याला जमीनीवर पटकले. त्यामुळे त्या बालकाच्या एका डोळयात जबरदस्त इजा आणि शरीरावर इजा होऊन निरपराध बालक थोडक्यात बचावला. प्रकरणी आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुरविण्याची विनंती आहे. अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक २.१०.२०१० तारीख असलेला अर्ज पोलीस उपविभागीय अधिकारी, उमरेड यांना दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना दिनांक १०.२.२०१० च्या पत्रानुसार दिनांक १८.२.२०१० रोजी चर्चेला बोलाविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.१.२०१० चा अर्ज प्राप्त झाला नव्हता. मात्र त्यांच्या अपील अर्जाचे संदर्भामध्ये त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४२०/अम/२००९.**

श्री. बाबाराव शंकरराव यादगिरे,
संजीवनी कॉलनी, राठीनगर,
अमरावती. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
जिल्हा परिषद, अमरावती. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १३.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १३.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. एस. एस. कोठेकर, वरिष्ठ सहाय्यक, जिल्हा परिषद, अमरावती हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे ग्रामसेवक पदाचे भरतीबाबत व समांतर

आरक्षणाबाबत सन २००८ या कालावधीतील एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी संबंधित कार्यालयाने माझे समाधान केले आहे आणि माहितीबाबत माझे पूर्ण समाधान झाले असल्याने सदर प्रकरणे आपले स्तरावर कृपया नस्ती करावे असे निवेदन राज्य माहिती आयोगास सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४७६/अम/२००९.

श्री. कमलकिशोर हेमराज वर्मा,
महाराष्ट्र बँकेच्या खाली, जयस्तंभ चौक,
ता. आकोट, जि. अकोला. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. व्ही. आकोटकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, आकोट, जि. अकोला.

श्री. एन. जी. यवतकार,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, आकोट, जि. अकोला. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, अकोट यांचेकडे नागरी दलित वस्ती सुधार योजना निधी अंतर्गत वार्ड क्र.

२ मध्ये नितोने यांच्या घरापासून कत्तलखान्यापर्यंत सिमेंट रस्ता हा जिल्हाधिकारी यांनी रद्य केला याबाबतची २००८ ते माहिती देईपर्यत एकूण ९ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, आकोट यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ३१.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदर पत्रावर वरिल प्रमाणे माहिती प्राप्त झाली अशी पोच अपीलकर्ता यांनी दिली असल्यामुळे व अपीलकर्ता आज सुनावणीस गैरहजर असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४७७/अम/२००९.

श्री. कमलकिशोर हेमराज वर्मा,
महाराष्ट्र बँकेच्या खाली, जयस्तंभ चौक,
ता. आकोट, जि. अकोला. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. व्ही. आकोटकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, आकोट, जि. अकोला.

श्री. एन. जी. यवतकार,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, आकोट, जि. अकोला. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर परिषद, अकोट यांचेकडे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत कामेबाबत व वार्ड क्र. २ नितोने यांच्या घरापासून

कत्तलखान्यापर्यंत सिमेंट रस्ता तयार करणेबाबतची २००७ ते माहिती देईपर्यंत एकूण १० मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, आकोट यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ३१.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदर पत्रावर वरिल प्रमाणे माहिती प्राप्त झाली अशी पोच अपीलकर्ता यांनी दिली असल्यामुळे व अपीलकर्ता आज सुनावणीस गैरहजर असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४७८/अम/२००९.

श्री. कमलकिशोर हेमराज वर्मा,
महाराष्ट्र बँकेच्या खाली, जयस्तंभ चौक,
ता. आकोट, जि. अकोला. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. व्ही. आकोटकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, आकोट, जि. अकोला.

श्री. एन. जी. यवतकार,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, आकोट, जि. अकोला. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर परिषद, अकोट यांचेकडे नागरी दलित वस्ती सुधार योजना व रस्ता निधी मधील कामाबाबत कंत्राटदाराचे

चेतन कडेल यांनी भरलेल्या निविदा बाबतची माहिती २००८ ते माहिती देईपर्यंत एकूण २ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, आकोट यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ३१.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदर पत्रावर वरिल प्रमाणे माहिती प्राप्त झाली अशी पोच अपीलकर्ता यांनी दिली असल्यामुळे व अपीलकर्ता आज सुनावणीस गैरहजर असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४७९/अम/२००९, अपील क्रमांक १४८०/अम/२००९, अपील क्रमांक १४८१/अम/२००९.**

श्री. कमलकिशोर हेमराज वर्मा,
महाराष्ट्र बँकेच्या खाली, जयस्तंभ चौक,
ता. आकोट, जि. अकोला. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. व्ही. आकोटकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, आकोट, जि. अकोला.

श्री. एन. जी. यवतकार,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, आकोट, जि. अकोला. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.४.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २२.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १४७९/अम/२००९ मध्ये दिनांक २४.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर परिषद, अकोट यांचेकडे सन २००८ मध्ये राबविण्यात आलेली अतिक्रमण मोहिम बाबतची माहिती. मोहिममध्ये वापरण्यात आलेल्या गजराज वाहन जेसीबी व गॅस कटरची माहिती व इतर मोहीमची माहिती एकूण ३१ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, आकोट यांनी अपीलकर्ता यांना दिनांक २३.३.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उक्त प्रकरणात मी मा. राज्य माहिती आयोग यांच्याकडे द्वितीय अपील प्रकरण दाखल केलेले असून वरील प्रमाणे मला माहिती प्राप्त झाली असून मी समाधानी आहे. आता मला पुढील कोणतीही कारवाई करायची नाही. करिता सदर पोच देऊन माहिती स्विकारत आहे असे लेखी लिहून दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

३.	अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १४८०/अम/२००९ मध्ये दिनांक १२.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर परिषद, अकोट यांचेकडे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत कामाबाबतची माहिती २००० ते माहिती देईपर्यंत एकूण २ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, आकोट यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ३१.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदर पत्रावर वरिल प्रमाणे माहिती प्राप्त झाली अशी पोच अपीलकर्ता यांनी दिली असल्यामुळे व अपीलकर्ता आज सुनावणीस गैरहजर असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

४.	अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १४८१/अम/२००९ मध्ये दिनांक १४.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर परिषद, अकोट यांचेकडे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत वार्ड अकोला रोड नाका (आंबेडकर मार्ग) ते कालंका चौकापर्यंत खडीकरण व रुंदीकरण व डांबरीकरण करणेबाबतची माहिती २००८ ते माहिती देईपर्यंत एकूण ९ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, आकोट यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ३१.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदर पत्रावर वरिल प्रमाणे माहिती प्राप्त झाली अशी पोच अपीलकर्ता यांनी दिली असल्यामुळे व अपीलकर्ता आज सुनावणीस गैरहजर असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६०/२०१०.**

श्री. गोपाल बालाजी झाडे,
८, पुरोहीत ले आऊट, अंबाझरी,
नागपूर. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
पशु संवर्धन दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२.

जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
पशु संवर्धन दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.४.२०१०)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २७.४.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे शासकीय

दुध योजना, नागपूर येथील कामकाजाबाबत विभागीय चौकशी प्र.क्र. दुविआ-५२९२ बाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० रोजी माहिती आयुक्त यांना लेखी निवेदन सादर केले आहे. त्यात माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १८.२.२०१० रोजी माहिती प्राप्त झाली असल्यामुळे सुनावणी ठेवू नये अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 187/2010**

श्री राजेश अजाबराव जाधव
सोमवारी क्वार्टर नं. 172/3 मस्जिद जवळ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
2) श्री रमेश काटे
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
स्व. भाऊसाहेब सुर्वे विद्यालय रघूजी नगर
नागपूर ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे खालीलप्रमाणे तीन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

1. शाळेनी मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे पाठविलेल्या पत्र क्र. बीएसव्ही/30/08 दि. 24.9.2008 ची सत्यप्रत व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती मिळण्याबाबत.

2. शाळेतील कार्यरत शिक्षकांची जुलै 2009 व ऑगस्ट 2009 च्या मंजूर केलेल्या पगार बिलाच्या सत्यप्रती मिळण्याबाबत.

3. शै. सत्र 2009–10 चे वर्ग 5 ते 7 व वर्ग 8 ते 10 चे वेळापत्रक सत्यप्रती मिळण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक प्रकृती अस्वास्थामुळे उपस्थित झाले नाही व त्यामुळे दि. 3.2.2010 रोजी माहिती सात दिवसात पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यानंतर

अपीलकर्ता यांना दि. 15.10.2010 रोजी माहिती घेवून जाण्यास पत्र दिले. त्याप्रमाणे अपीलकर्ता हे माहिती घेण्यास गेले होते परंतु जन माहिती अधिकारी हे कार्यालयात उपस्थित नव्हते त्यामुळे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ते गंभीर आजाराने आजारी होते व त्यामुळे ते कार्यालयात उपस्थित नव्हते व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. परंतु ते तीन महिन्याच्या कालावधीत उपस्थित नव्हते किंवा कसे याबाबत विचारले असता ते मधून मधून आंतररुग्ण म्हणून दाखल झाले होते. मात्र माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 183/2010

श्री यशवंत नामदेव झाडे
वार्ड क्रं.34 पोद्यार बगिचा वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. एस. निमगडे
प्रथम अपीलीय अधिकारी
समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा

2) जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट अ
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी वर्धा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.
1. प्रगती अपंग औद्योगिक कर्मशाळा देवळी जि.वर्धा ही शाळा चालविणा–या संस्थेचे नाव नोंदणी क्रमांक व संचालक मंडळाची यादी.
2. 2006–07, 07–08, 08–09, 2005–06 या वर्षातील शिक्षण घेणा–या विद्यार्थ्याची वर्षनिहाय यादी व अपंग प्रमाणपत्रे.
3. या संस्थेतील 2005–06 ते 08–09पर्यंतचे शिक्षण शिक्षकेतर व वसतीगृहातील कर्मचारी यादी नियुक्ती दिनांक शैक्षणिक पात्रता
4. या अपंग शाळेतील कर्मशाळेत शिकविले जाणारे ट्रेड व त्यांचा कालावधी नावे, बॉम्बे टेक्नीकल बोर्डाचे मान्यता प्रमाणपत्र

5. 2005–06 या वर्षात या संस्थेला दिलेला स्कॉलरशिप व घेणा–या विद्यार्थ्यांची यादी सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.10.2009 रोजी माहिती शोधून ती आपणास देण्यास काही कालावधी लागेल माहिती संकलीत होताच आपणास माहिती घेवून जाण्यास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 19.12.2009 रोजी अध्यक्ष सचिव प्रगती अपंग औद्योगिक कर्मशाळा देवळी यांना पत्र दिलेले दिसून येते. व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही. मात्र दि. 17.2.2010 रोजी माहिती उपलब्ध झाली ती 298 पृष्ठे आहेत परंतु ती त्यांनी मागितलेली माहिती नाही. व त्याबाबतही मागितलेली माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही प्रगती अपंग औद्योगिक कर्मशाळा देवळी यांचेकडील माहिती आहे व ते माहिती अधिकारी आहेत व त्यामुळे त्यांचेकडून माहिती मागणे संयुक्तिक होते. परंतु तरी सुध्दा त्यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून दि. 16.9.2009 रोजी कर्मशाळा प्रमुख प्रगती अपंग औद्योगिक कर्मशाळा देवळी यांना पत्र दिले. सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतु त्या कर्मशाळा प्रमुखाकडून माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्ता यांना दि. 30.10.2009 रोजी कळविण्यात आले होते. पुन्हा दि. 26.11.2009 व 19.12.2009 रोजी स्मरण पत्र दिलेले आहे. दि. 28.10.2009 रोजी सुध्दा उर्वरीत माहिती साठी त्यांना पत्र दिलेले आहे. दि. 17.2.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु त्यावर अपीलकर्ता यांनी आक्षेप घेतलेले असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी सुध्दा संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागणे आवश्यक होते व ती मागितलेली नसल्यामुळे विलंब झालेला दिसून येतो. ज्या माहिती अधिका–यांना माहिती मागितली त्यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्याचे प्रयत्न केलेले दिसून येतात परंतु माहिती उपलब्ध करुन देतांना ती तपासून दिलेली दिसून येत नाही. तेव्हा अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्येनिहाय माहिती तपासून देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 17.9.2009 मधील अर्जात मागितलेली माहिती विहित कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी दंडास पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 184/2010**

सौ. शोभा महेश पाली
प्लॉट नं. 366 टांगा स्टॅन्ड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डॉ. एम. आर. गणविर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री व्ही. ए. बागल
जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी
(आरोग्य विभाग) महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी महानगर पालिका नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. नागपूर महानगर पालिका तर्फे सन 1994 मध्ये अर्जदाराला मोक्षधाम दहन घाट चालविणेकरिता मृतदेहाचे अंतिम संस्कार विधीसाठी ठेकेदारी स्वरुपात ताबा देण्यात आला होता काय देण्यात आले असेल तर त्याचा दिनांक व वर्षासह माहिती लेखी स्वरुपात देण्यात यावी.
2. वरील घाटाची निविदा मंजूर करुन, अर्जदारास ठेका दिला असेल तर नागपूर महानगर पालिका तर्फे मोक्षधाम दहन घाट ठेक्यावर देणेकरीता कोणत्या दैनिक वर्तमान पत्रामध्ये लेखी निविदा सूचना प्रकाशित करण्यात आली होती त्या वर्तमानपत्राची दिनांकासह वर्तमानपत्राची कात्रणांची छायांकन प्रत सांक्षांकित करुन देण्यात यावी.
3. वरील मोक्षधाम दहन घाटाची निविदा प्रपत्राची विक्रीचा दिनांक व वेळ, निविदाच्या अटीप्रमाणे भरलेल्या निविदा सादर केल्याचा दिनांक व वेळ एकूण प्राप्त झालेल्या निविदांची संख्या, निविदा दाखल करणा—या लोकांची नावे व पत्ते, मोक्षधाम दहन घाटाकरीता निविदा प्रमाणे अनुमानित शुल्क रक्कम किती होती आणि अग्रिम दाखल जमा राशि किती होती. प्रपत्राची किंमत किती होती. दाखल निविदा उघडण्याची तारीख व वेळ सर्व दस्ताऐवज सांक्षांकित करुन द्यावे.
4. अर्जदाराची मोक्षधाम दहन घाटाची निविदा मंजूर झाल्यापासून अर्जदाराची मोक्षधाम दहन घाटाचा ताबा अर्जदारास दिल्यापासून ताबाची अवधी संपेपर्यंत आपल्या कार्यालया मार्फत जे लेखी पत्र व्यवहार अर्जदारा सोबत करण्यात आले त्या सर्व लेखी दस्तऐवजांची छायांकन प्रती सांक्षांकित करुन द्यावी.

5. अर्जदारानी नागपूर महानगर पालिका कार्यालयात मोक्षधाम दहन घाटाचे रोख शुल्क भरले नाही तर अर्जदाराचा ठेका आदेश रद्य करुन मोक्षधाम दहन घाटाचा ताबा नागपूर महानगर पालिकानी आपल्या ताब्यात कां घेतला नाही याचे वाजवी कारण काय व याकरीता सर्वस्वी जबाबदार कोण याबाबतची कारणे लेखी स्वरुपात माहिती सह पुरवठा करण्यात यावा.
6. अर्जदाराने मोक्षधाम दहन घाटाची रोख रक्कम नागपूर महानगर पालिका येथे दाखल केली नाही याकरिता लेखी वारंट निर्गमित करण्याची कार्यवाही आपले कार्यालया मार्फत करण्यात आली होती काय व नमूद अवधी मध्ये अर्जदाराने मोक्षधाम दहन घाटाची रोख रक्कम किती जमा केली त्या पावती बुकाची छायांकन प्रती व कोणत्या वर्षात किती रककम भरले नाही याबाबत सर्व दस्तऐवजांच्या प्रति सांक्षांकित करुन देण्यात यावे.
7. अर्जदारास मोक्षधाम दहन घाटाचा ठेका देण्यास शासकीय नियमाप्रमाणे प्रथम किती रक्कम अग्रिम स्वरुपात जमा करावी लागते व निविदान्वये कोणकोणत्या आवश्यक दस्तऐवज सादर करण्याची नियमाप्रमाणे आवश्यकता असते तसेच मोक्षधाम दहन घाटाचा ताबा देण्यापूर्वी अर्जदाराकडून रोख शुल्क अग्रिम स्वरुपात हस्तगत करुन जमा करण्यात आली होती या संदर्भातील सर्व दस्तऐवजांच्या छायांकन प्रती सांक्षांकित करुन देण्यात यावे.
8. अर्जदाराकडून मोक्षधाम दहन घाटाचा ताबा नागपूर महानगर पालिकेनी कोणत्या वर्षी घेतले. तारखेसह वेळ याबाबत माहिती व त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी मोक्षधाम दहन घाटाचा ठेका कोणत्या ठेकेदाराला देण्यात आला होता व अर्जदाराकडून ताबा हस्तांतरीत केल्यानंतर लेखी पत्र देण्यात आले होते काय तसेच ज्या इसमांस नागपूर महानगर पालिके कडून घाटाचा ताबा देण्यात आला त्या इसमाचे नाव गाव पूर्ण पत्ता आणि वरील मोक्षधाम घाटावर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी वरील ठेकेदाराची निविदा मंजूर करण्यात आली ही निविदा आपले कार्यालया मार्फत कोणत्या दैनिक वर्तमान पत्रामध्ये प्रकाशित करण्यात आली होती त्या वर्तमानपत्राची दिनांकासह निविदा जाहिरातीची छायांकन प्रत सांक्षांकित करुन देण्यात यावी. सदरची माहिती 48 तासाच्या आंत स्पिड पोस्टद्वारे द्यावी असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 28.10.2009 रोजी सन 1994 मधील मोक्षधाम घाटा संदर्भात अभिलेख या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे विचारण करण्यात आलेली माहिती देता येवू शकत नाही याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 4.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलामध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज करण्यात आलेली दिसून येते. त्यानंतर दि. 8.2.2010 रोजी पुन्हा उपायुक्त यांनी चुकीची तारीख टाकून समाधान न झाल्यास आपण पुन्हा रितसर अर्ज या कार्यालयाकडे सादर करावा असे उत्तर दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दि. 6.2.2010 रोजी अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त यांना महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम 2005 च्या तरतुदीचा उल्लेख केला अशा आशयाचे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यावरही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दखल घेतलेली दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की सन 1994 या वर्षाचा ठेक्याच्या संदर्भामध्ये त्यांचे विरुध्द लेखी वारंट निर्गमीत करण्याची कार्यवाही झालेली आहे व त्यामुळे हायकोर्ट केस नं. डब्लूपीएन799/99 ची प्रत हस्तगत करुन एकुण 8 मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की इतर सर्व वर्षाची माहिती उपलब्ध आहे परंतु 1994 ची संबंधित नस्ती उपलब्ध नाही ती गहाळ झालेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम 2005 च्या तरतुदी प्रमाणे कार्यवाही करावी असेही कळविले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त यांनी त्याबाबतची कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी आपले कर्तव्याचे उल्लंघन केलेले आहे असे दिसून येते. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम 2005 च्या कलम 9 प्रमाणे एफ आय आर दाखल

करणे आवश्यक होते परंतु ती दाखल केलेली नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा सदरची माहिती गहाळ झाल्याबद्यल महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम 2005 च्या कलम 9 प्रमाणे संबंधित पोलीस स्टेशनकडे एफ आय आर दाखल करावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 186/200**

श्री अशोक माणिकराव भजन
रा. लिंगा
पो. ता. काटोल जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रदिपकुमार डांगे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
2) श्रीमती आशा पठाण
जन माहिती अधिकारी तथा प्रभारी अधिकारी
राजस्व अभिलेखागार विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा राजस्व अभिलेखागार जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे जंगल/जमिनी बाबतचा जुना रेकॉर्ड मिळण्याबाबत. सन 1994 ते 1952 या कालावधीतील सर्वे नं. 26 जंगल मौजा खंडाळा खुर्द ता. काटोल जि. नागपूरचा अधिकार अभिलेख, बंदोबस्त व किस्तबंदी देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती साधे टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 27.8.2009 रोजी सन 1994 ते 1952 या कालावधीतील मौजा खंडाळा खुर्द येथील जंगल/जमिनी बाबतचा जुना रेकॉर्ड या विभागात उपलब्ध नाही तसेच किस्तबंदी या बाबतचा रेकॉर्डचा शोध घेण्याकरीता स्वतः कार्यालयात उपस्थित राहून शोध फी भरुन रेकॉर्ड उपलब्ध असल्यास देता येईल तसेच किस्तबंदी या रेकॉर्डचे वर्ष 1954–55 राहील असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 12.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 23.11.2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती

अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध नसल्याने व अपीलार्थीला मुदतीत कळविले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. मात्र त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्याचे कार्यालयात सदरचे अभिलेख उपलब्ध नाहीत. भूमी अभिलेख कार्यालयात उपलब्ध होण्याची शक्यता आहे. परंतु आता या क्षणाला पुन्हा अपीलकर्ता यांना भूमी अभिलेख कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे आदेश देणे योग्य नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी भूमी अभिलेख कार्यालयातून संबंधित माहिती बद्यल शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 11.8.2009 च्या अर्जातील मागितलेल्या माहितीचा शोध भूमी अभिलेख कार्यालयातून घेवून माहिती उपलब्ध झाल्यास संकलित करुन अपीलकर्ता यांना विनामुल्य साध्या पोस्टानी उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 185/2010**

श्री साईद्रनाथ जगन्नाथजी जवंजार
मु. पो. मिरेगाव
ता. लाखनी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य. विभाग)
जिल्हा परिषद भंडारा
ता. जि. भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
शुक्राचार्य विद्यालय मिरेगाव
ता. लाखनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक शुक्राचार्य विद्यालय मिरेगाव यांचेकडे सन 1993 ते 2006 या कालावधीत मुख्याध्यापक शुक्राचार्य विद्यालय मिरेगाव येथे कार्यरत सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा—यांचे अप्रूव्हल तसेच अप्रूव्हल मिळण्यासाठी संस्थेने व संबंधित कर्मचा—यांनी लिहून दिलेले दस्ताऐवज यांच्या सत्यप्रत मिळण्याबाबत सर्वसाधारण टपालाद्वारे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 14.9.2009 रोजी शिक्षक कर्मचा—या विषयीची वैयक्तिक आहे तेव्हा वैयक्तिक स्वरुपाची माहिती संबंधिताच्या संमतीशिवाय देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.11.2009 रोजी देण्यात आलेला असून मागणी केलेली अ.क्र. 1 ते 7 मुद्यांमधील माहिती अप्रूव्हलच्या प्रति निःशुल्क झेरॉक्स काढून 15 दिवसाचे आंत पुरविण्यात यावे अन्यथा मुख्याध्यापकाचे डिसेंबर 2009 चे वेतन थांबविण्यात येईल असा आदेश दिलेला दिसून येतो व त्याची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते.

त्यावर दि. 15.12.2009 रोजी अपीलकर्ता यांनी पुन्हा शिक्षणाधिकारी (माध्य.) जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे अशी तक्रार केली. परंतु त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलाची सुनावणी घ्यावी म्हणून शिक्षणाधिकारी यांचेकडे अर्ज केला परंतु त्याची पुर्नसुनावणी झालेली नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही असा युक्तीवाद केला.

3. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री एम. एल. भुरे ॲड. यांनी असे सांगितले की त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे व श्री जवंजाळ यांनी केलेल्या अनैतिक प्रकरणामुळे त्यांना संस्थेनी दि. 11.1.1999 पासून सेवामुक्त केले आहे तेव्हापासून प्रकरण शाळा न्यायालय व नागपूर खंडपीठात न्यायप्रविष्ट आहे. अशा परिस्थितीत आपल्या सेवेसंबंधीची वैयक्तिक स्वरुपाची गोपनिय माहिती तिस–या पक्षास कळविण्यासंबंधी स्वतःचे हमी पत्र लेखी स्वरुपात सादर करावे. जेणेकरुन कार्यालयीन कार्यवाही करण्यासंबंधी सुलभ जाईल हयाची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 10.9.2009 रोजी देवाजी दुर्योधन गिदमारे व इतर सर्व शिक्षक कर्मचा–यांनी माझ्या सेवेसंबंधीच्या दस्ताऐवजाचा त्यांच्या हितसंबंधाशी कोणताही संबंधी नाही. त्यामुळे माझ्या सेवेसंबंधीची वैयक्तिक स्वरुपाची कोणतीही गोपनिय माहिती शाळेने पुरवू नये. त्यास माझी संमती नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे दि. 14.9.2009 रोजी वैयक्तिक स्वरुपाची माहिती संबंधीताच्या संमतीशिवाय देता येणार नाही असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. वास्तविक अशा प्रकारे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी चौकशी करुन निर्णय देणे आवश्यक होते परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता निर्णय दिलेला दिसून येतो. दि. 30.11.2009 रोजी मुख्याध्यापक यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना निर्णयाचा पुनर्विचार करावा असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यांनी त्याबाबत कोणताही विचार केलेला नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की सदरची माहिती शिक्षणाधिकारी यांचेकडे सुध्दा उपलब्ध असते व त्यांनी ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी संस्थेनी अनैतिक कृत्यामुळे सेवामुक्त केले असले तरी व प्रकरण न्यायप्रविष्ट असले तरी अपीलकर्ता यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–यांची माहिती मागणे याचा अर्थ संस्थेस वेठीस धरणे याशिवाय दुसरा उद्येश असू शकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी इतरांची माहिती त्यांच्या संमतीशिवाय उपलब्ध करुन देता येत नाही हे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी कळविलेले योग्य दिसून येते. त्यावर पुन्हा अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना त्यांच्या संस्थेची माहिती व त्यांच्या जागेवर नियुक्त झालेल्या शिक्षकाची माहिती उपलब्ध करुन दिली तर त्यांचे समाधान होईल कारण त्यांना मागितलेल्या माहितीमध्ये व्यापक जनहित काय आहे याबद्यल कोणताही खुलासा आयोगापुढे करता आलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांची स्वतःची वैयक्तिक माहिती व त्यांच्या जागेवर नियुक्त झालेल्या शिक्षकाची माहिती विनामुल्य टपालाद्यद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1402/2009

श्री निवृत्ती तुळशिराम कुळसंगे
पोलीस मुख्यालय वसाहत क्वार्टर नं. 62
यवतमाळ ता. जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री कैलास कणसे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
ता. जि. यवतमाळ
2) श्री विनोद पटोले
जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
ता. जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 17.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांचे म्हणणे दि. 17.3.2010 रोजी एकुण घेण्यात आलेले आहे. उत्तरवादी यांचे कार्यालयात पोलीस भरती असल्यामुळे दि. 17.3.2010 रोजी उपस्थित नव्हते. परंतु आज उत्तरवादी हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दि. 6.4.2010 रोजी घेण्यात आली.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक यांचेकडे एकुण बारा मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 31.12.2008 रोजी माहिती देण्यास बि. स. ने कळविण्यात आले होते. परंतु न आल्याने जा.रजि.क्र. 336/09 दि. 23.2.09 प्रमाणे जन माहिती अधिकारी यवतमाळ यांचे मार्फत माहिती पुरविण्यात आली. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 12.3.2009 रोजी आपले अर्जात नमुद मुद्या क्र. 1 व 2 संबंधी जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी वणी यांचेकडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविण्यात आल्याबाबत त्यांचा अहवाल मागवून सुधारीत योग्य माहिती आपणास पुरविण्यात येईल व मुद्या क्र. 3 ते 8 हे मुद्ये तपासा संबंधात आहे व ते न्यायालयीन कक्षेत असल्याने त्याची माहिती आपणास देता येणार नाही तसेच प्राथमिक चौकशी मध्ये

झालेल्या कार्यवाहीचा अहवाल आपणास देता येईल असे सांगितले त्यामुळे समाधान झाल्याचे मान्य केले व अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना मुद्या क्र. 2,3,4,5,6,8 ची माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचे विरुध्द भा.द.वि.संहिता प्रमाणे 376 चा गुन्हा दाखल झालेला आहे. व त्या संदर्भातील तपास पूर्ण होवून दोषारोपपत्र सुध्दा न्यायालयात दाखल झालेले आहे व त्यातून त्यांना सर्व कागदपत्रे सुध्दा उपलब्ध झालेले आहे. व आता अपीलकर्ता जे कागदपत्र मागत आहेत ती हा तपास प्राथमिक आवसथेत असतांनाचे पत्रव्यवहार आहे. कोणत्याही गुन्हयाचा तपास करतांना प्राथमिक अवस्थेत निश्चित असा तपास झालेलाच असतो असा नाही व त्या त्या वेळी त्याबाबतचा पत्रव्यवहार झालेला असतो. परंतु त्यास कोणत्याही प्रकारचे अंतिम स्वरुप नसते व त्यामुळे अशा प्रकारचा पत्रव्यवहार उपलब्ध करुन देणे हे न्यायालयीन चौकशीच्या संदर्भात साक्षीदाराच्या बाबतीत धोकादायक असू शकते व जो अंतीम दोषारोपत्राचा भागही होत नाही. तो उपलब्ध करुन देणे यात कोणतेही व्यापक जनहित नसल्यामुळे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. मात्र अपीलकर्ता यांना आवश्यक असलेली उर्वरीत सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे आयोगाची सुध्दा खात्री झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 182/2010**

श्री आर. डी. दहाट
65 विवेकानंद नगर साई मंदिर मागे
वर्धा रोड नागपूर ता. जि. नागपूर 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य. विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
2) श्री राऊत
जन माहिती अधिकारी तथा माध्यमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 64..2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.
मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर याचिका क्र.3421 दि.8.2.06 च्या आदेशानुसार तसेच आपले आदेशानुसार श्री खडाश्रम विद्यालय कुही येथे माझे समायोजन झाले. दि. 31.8.06 रोजी मला सेवानिवृत्त केले. परंतु आपले पत्र क्र.6308 दि. 7.11.09 नुसार मा. शासनाची दिशाभूल करण्यासाठी माझी पुनर्नियुक्ती करण्यात आली असा उल्लेख करुन खोटा अहवाल दिला. पुनर्नियुक्तीच्या आदेशाची प्रमाणित प्रत तात्काळ देण्यात यावी. अर्जाच्या अनुषंगाने दि. 11.12.2009 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.)यांनी दि. 7.11.2009 च्या अहवालाची प्रत मागितली ती देण्यात आली. परंतु सदर पत्रात पुनर्नियुक्तीच्या आदेशाची प्रत उपलब्ध नसल्यामुळे देता येणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 1.1.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांचे मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे समायोजन झालेले आहे. व त्यामुळे त्यांची पूर्वीची सेवा व समायोजना नंतरची सेवा मिळून त्यांना सेवानिवृत्ती वेतन मिळणे आवश्यक आहे. परंतु

कार्यालयानी पुनर्नियुक्ती हा शब्द वापरल्यामुळे व तसा अहवाल दि. दि. 7.11.2009 रोजी मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडे पाठविलेला असल्यामुळे त्यांना सेवानिवृत्ती वेतन मिळण्यास अडचणी येत आहे व म्हणूनच त्यांनी त्यांच्या पुनर्नियुक्तीच्या आदेशाची प्रत मागितलेली आहे. परंतु त्यांना पुनर्नियुक्तीच्या आदेशाची प्रत उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही असे कळविलेले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की प्रत्यक्षात पुनर्नियुक्ती होत नसल्यामुळे पुनर्नियुक्तीचा आदेश काढला जात नाही. व त्यामुळे ही प्रत उपलब्ध करुन देता येत नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांना त्यांचे समायोजन झालेले असल्यामुळे पुनर्नियुक्तीचा आदेश काढण्याची आवश्यकता नाही व तसा तो काढलेला नसल्यामुळे आदेशाची प्रत उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांची खडाश्रम विद्यालय कुही येथे समायोजन झाल्यानंतर पुनर्नियुक्तीचा आदेश शासनाने काढलेला असल्यास त्या आदेशाची प्रत उपलब्ध उपलब्ध करुन देण्यात त्यावी अन्यथा पुनर्नियुक्तीचा आदेश काढण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे पुनर्नियुक्तीच्या आदेशाची प्रत देता येत नाही असे स्पष्ट कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 180/2010**

श्री तुकडू बारीकराव मेश्राम
मालवीय नगर तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा 441912 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री किशोर धोटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा
2) श्री के. एन. मानकर
जन माहिती अधिकारी तथा माध्यमिक शिक्षण लिपीक
नगर परिषद तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी एकुण आठ माहितीचे अर्ज दाखल केले परंतु सोबत दोन अपीले दाखल केली व त्यातून एकच द्वितीय अपील दाखल केले. परंतु सदरची कार्यपध्दती ही अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नसल्यामुळे त्यांचा दि. 20.10.2009 चा अर्ज त्यांच्या संमतीने विचारात घेण्यात आला. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी श्री एस. बी. मलेवार स. शि. यांच्या संदर्भात मुख्याधिकारी तथा माहिती अधिकारी नगर परिषद तुमसर यांचेकडे एकुण तीन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 13.11.2009 रोजी प्रतिपृष्ठ 2 रु. प्रमाणे एकण 10 रु. भरण्यास कळविण्यात आले व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 13.11.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 31.12.2009 रोजी व द. 24.12.2009 रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलीत. सदरच्या अपीलाचा निर्णय दि. 22.1.2009 रोजी देण्यात आलेला असून शिक्षण विभात उपलब्ध असलेले दस्तऐवज व इतर रेकॉर्ड अपीलकर्ता यांना पाहणी करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात यावी व माहिती अर्जाच्या मुद्याशी संबंधित दस्तऐवज जर अपीलकर्ता

यांना हवी असल्यास आवश्यक ती फी घेवून 15 दिवसात देण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येतात. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.1.2010, दि. 25.1.2010, दि. 27.1.2010, दि. 28.1.2010 व दि. 29.1.2010 रोजी सर्व अभिलेख तपासणीस देण्यात यावून त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली व त्यात एकुणन 11 मुद्यांच्या छायांकित प्रति उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. यावरुन अपीलकर्ता यांना आतापर्यंत सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना श्री मलेवारच्या संदर्भामध्ये जी माहिती देण्यात आलेली आहे ती योग्य नाही. श्री मलेवार यांना सन 1998 ते 2000 या कालावधीतील जे वेतन दिलेले असेल व त्यांच्या सुधारीत निवृत्ती वेतनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला असल्यास त्याची माहिती उपलब्ध करुन दिल्यास त्यांचे समाधान होईल असे त्यांचे म्हणणे आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत श्रीयुत एस.बी.मलेवार यांना सन 1998 ते 2000 या कालावधीतील मुख्याध्यापक असतांना दिलेल्या वेतनाची माहिती त्यांच्या सेवा निवृत्तीच्या संदर्भात पाठविलेल्या सुधारीत प्रस्तावाची छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 179/2010**

श्री अशोक जैराम कुथे
माता वार्ड संत गजानन महाराज मंदिर जवळ
देसाईगंज वडसा
ता. देसाईगंज वडसा जि. गडचिरोली 441207 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एम. हस्ते
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक
व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण प्रशिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय
सिव्हील लाईन्स नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
बाबुराव मडावी कनिष्ठ महाविद्यालय देसाईगंज
ता. देसाईगंज वडसा जि. गडचिरोली 441207 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. ..200 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता उपस्थित आहे. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲडव्होकेट हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.5.2009 रोजी च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाली असे आयोगापुढे सांगितले. तरी सुध्दा प्रथम अपील व द्वितीय अपील का दाखल केले याबद्यल विचारले असता ते समाधानकार उत्तर देवू शकले नाही त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 147/2010**

श्री बी. के. कोठारे स.शि.
जिल्हा परिषद(मा.शा.) विद्यालय राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.विभाग)
जिल्हा परिषद चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर
2) श्री एस. बी. चांदेकर अधिक्षक
जन माहिती अधिकारी तथा प्राथमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे कर्तव्य काळातील वेतन काढण्याबाबत स्मरणपत्र दि.12.9.2008 नुसार कार्यालयीन पत्र दि. 10.8.2009 नुसार प्रकरण निकाली काढण्याच्या दृष्टीने दि. 14.8.2009 ला मुख्याध्यापक जि.प.हाय.राजुरा व मी कर्तव्य काळातील पगार काढण्यासाठी लेखी निवेदन अधिक्षक रामटेके यांचेकडे दिले. दप्तर दिरंगाईचे कारण व प्रलंबित प्रकरण केव्हा निकाली काढणार याविषयीची माहिती स्वतः घेवून जाणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 24.11. 2009 रोजी मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे तर माहितीच्या अधिकारात तशी माहिती देण्याची तरतुद नाही असे कळविलेले दिसून येते. व दि. 30.11.2009 रोजी माहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापक यांना कळविलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा होणा–या विलंबनास सर्वस्वी आपली जबाबदारी राहिल असे कळविलेले दिसून येते. व त्याची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे व माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 29.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.4.2010 अन्वये कळविण्यात आला. व जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी त्यांच्या दि. 12.9.2008 च्या तसेच दि. 14.8.2009 च्या निवेदनावर झालेली कार्यवाहीची माहिती मागितली यात कोणताही प्रश्न नाही व तरीही जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली असे कारण देवून अर्ज फेटाळण्यात आला. आज आयोगापुढे जन माहिती अधिकारी हे उपस्थित नाही. सहाय्यक माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत. परंतु त्यांना याबाबत काहीही आयोगास सांगता आलेले नाही. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

कोणत्याही प्रकारची बुध्दी न वापरता व अर्जाचे वाचन न करता प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी न घेता प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती आहे असे उत्तर दिल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. व त्यांनी सुध्दा शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 31.10.2009 च्या अर्जा मध्ये नमुद केलेले दि. 14.8.2009 चे वेतन व दि. 12.9.2008 च्या स्मरणपत्रावर झालेली कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) जन माहिती अधिकारी तथा प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी चुकीचे व दिशाभूल करणारे उत्तर दिलेले असल्यामुळे व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रु. 10000/- शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा चौकशी न करता जन माहिती अधिकारी यांचा निर्णय काचम ठेवला असा निर्णय दिलेला असल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 148/2010 व**
**अपील क्रमांक नाग 149/2010**

श्री रामचंद्र क्रिष्णाजी मारटकर
अमराई वार्ड मु. पो. ता. राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर 442905 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.विभाग)
जिल्हा परिषद चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग 2
प्राथमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता आज हजर आहेत व त्यांनी दुरध्वनीवर प्रकृती अस्वास्थामुळे उपस्थित राहू शकत नाही असे कळविले. उत्तरवादी मात्र चंद्रपूर येथून येवून हजर झालेले आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे 1. बालविदया शिक्षण प्रसारक मंडळ राजूरा र.नं.2146 या संस्थेनी 1994–95 या शै. सत्रात म.प्राथ.शाळा उघडण्या करीता पाठविलेल्या प्रस्तावाची प्रमाणित झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

2. वरील संस्थेनी सन 1997–98 या शै. सत्रात म.प्राथ.शाळा काढण्या करीता पाठविलेल्या प्रस्तावाची प्रमाणित झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

3. तसेच वरील संस्थेनी सन 2002–03 या शै. सत्रात विना अनुदानीत म.प्राथ.शाळा उघडण्या करीता आपल्या कार्यालयाकडे पाठविलेल्या प्रस्तावाची प्रमाणित झेरॉक्स प्रत देण्यात यावी. तसेच दि. 3.9. 2009 नुसार आपल्या कार्यालयाने पाठविलेल्या पत्रानुसार वरील दोन्ही पत्र माझ्याकडे उपलब्ध नसल्यामुळे शिक्षणाधिकारी कार्यालय पत्र क्र.853 दि. 28.8.08 तसेच पत्र क्र.445 दि. 4.4.09 ही दोन्ही पत्र माझ्याकडे उपलब्ध नसल्यामुळे दोन्ही पत्राची झेरॉक्स प्रमाणित करुन मला पाठविण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. दोन्ही अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दि. 13.11.2009 व दि. 22.1.2009 अन्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यापूर्वी सुध्दा दोन्ही प्रति दिनांक 28.8.2008 व 4.4.2009 ला देण्यात आल्या होत्या. पुनश्च त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये त्यांना त्या पुरविण्यात आलेले आहे. असे असून सुध्दा अपीलकर्ता यांनी दि. 26.11.2009 रोजी प्रथम अपीले दाखल केलीत. प्रथम अपीलाचा निर्णय माहिती पुरविलेली असल्यामुळे खारीज करण्यात आले व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

2

3. दाखल केलेल्या दि. दि. 13.11.2009 व दि. 20.3.2010 चे पत्रा वरुन अपीलकर्ता यांना तसेच दिनांक 28.8.2008 व 4.4.2009 च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. असे असून सुध्दा अपीलकर्ता यांनी प्रथम अपील किंवा द्वितीय अपील का दाखल केले याबद्यल काहीही खुलासा केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे भास्कर गणपतराव येसेकर सचिव बालविद्या शिक्षण प्रसारक मंडळ राजूरा यांनी तसेच अध्यक्ष सतीश या. धोटे तसेच उपअध्यक्ष मनोहर साबनानी यांनी पाठविलेल्या पत्राच्या प्रती सादर केलेल्या आहेत. त्यात आदर्श मराठी प्राथमिक विद्या मंदिर व आशादेवी प्राथमिक विद्या मंदिर कोणत्याही पालकाची फी बाबत तक्रार नाही. दोन्ही शाळा कोणत्याही प्रकारची मुलांकडून फी घेत नाही. श्री रामचंद्र मारटकर यांनी केलेली तक्रार ही खोटी आहे. श्री रामचंद्र मारटकर हे निवडणूकीत पराभूत झाल्यामुळे व संस्थेच्या व शाळेच्या विरोधात ते सुडभावनेने खोटया तक्रारी करीत आहेत. तसेच सदरच्या आमसभेत त्यांचे साधारण सभासदत्व रद्य केलेले आहे. मारटकर यांचा संस्थेशी कोणताही संबंध राहिलेला नाही. संस्थेचे व शाळेचे ऑडीट 2007पर्यंत झालेले आहे. त्याची नक्कल धर्मदाय आयुक्त यांचेंकडे सादर केली जाते. शिक्षण विभागडून चौकशी सुध्दा झालेली आहे वगैरे अशा प्रकारचे तक्रारीची प्रत आयोगाचे निदर्शनास आणले. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले ही खारीज करण्यात येतात.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 181/2010**

श्री रमेश धनसिंग राठोड
1 के. बापूनगर उमरेड रोड नागपूर
ता. जि. नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. एस. पोटदुखे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग प्रादेशिक विभाग नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती रजनी कोठारे
जन माहिती अधिकारी तथा सहा. मुख्य अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग प्रादेशिक विभाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. मुख्य अभियंता यांचेकडे (माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता असून सुध्दा) श्री एन. बी. चौधरी यांच्या संदर्भात एकुण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 19.12.2009 रोजी आपण यापूर्वीचा आपला अर्ज दि. 19.12.2006 अन्वये या कार्यालयास दाखल केला होता. परंतु माहिती आपले प्रकरणाशी संबंधित नसल्याने या कार्यालयाचे पत्र क्र. मा–चौकशी/मा.अ.अ.05/प्र.क्र.88/171 दि. 15.1.2007 चे पत्रान्वये याबाबत आपणास कळविण्यात आलेले आहे. तसेच मुद्या क्र. 2 ची माहिती या कार्यालयाशी संबंधित नसल्याने सदरची माहिती ही कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग क्र.2 नागपूर या कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांचेकडे अर्ज सादर करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 22.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 2.2.2010 रोजी सुनावणी घेण्यात आली. व पुन्हा अपीलकर्ता यांना दि. 16.2.2010 रोजी माहितीचे शुल्क रु. 522/– चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. प्रथम

अपीलाचा निर्णय हा दि. 20.2.2010 रोजी देण्यात आला असून श्री एन. बी. चौधरी तत्कालीन उप अभियंता यांचे विभागीय चौकशीचे प्रकरण शासन स्तरावरुन हाताळण्यात आले असून अंतिम निर्णय सुध्दा शासन स्तरावरुनच निर्गमीत करण्यात आलेले आहे. व त्या संदर्भातील नस्ती कार्यालयात उपलब्ध नाही तसेच रु. 5422.65 च्या कॅशबुक नोंदप्रत कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग क्र.2 नागपूर यांचे कार्यालयात उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले असून त्यांचेकडे आवश्यक रकमेचा भरणा करुन प्राप्त करुन घेण्याचे ठरले असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की श्री एन. बी. चौधरी यांच्या संदर्भातील विभागीय चौकशीच्या अहवालाची प्रत देण्यात आलेली आहे. परंतु त्या सोबत असलेली कागदपत्रे ही सहा वर्षाचा कालावधी झालेला असल्यामुळे नियमाप्रमाणे ती नष्ट करण्यात आलेली आहे. त्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही असे मुख्य कार्यालयानी कळविले आहे. व त्यातही माहिती ही या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा स्वस्पष्ट दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 192/2010

श्री असंघ भगवानदास रामटेके (सरचिटणीस)
द्वारा–रोजंदारी कर्मचारी संघटना 126 बी/8 एम.आय.जी.
हुडको कॉलनी नारा रोड
पो. जरीपटका नागपूर 440014 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
म.रा.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
भांबुर्डा, शिवाजीनगर बालचित्रवाणी शेजारी पुर्ण 411004

2) जन माहिती अधिकारी तथा सहा. सचिव
म.रा.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
भांबुर्डा, शिवाजीनगर बालचित्रवाणी शेजारी पुणे 411004 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांनी दि. 21.5.2009 रोजी राज्य माहिती आयोग खंडपीठ पुणे यांचेकडे दि. 24.2.2009 च्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात द्वितीय अपील दाखल केले होते. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांचेकडे सुध्दा दि. 14.7.2009 रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. 15.9.2009 रोजी झालेली असून त्यामध्ये अपील क्र. 579/2009, 580/2009, 572/2009 च्या संदर्भात निर्णय झालेला असून अपीलकर्ता यांचे अपील क्र. 579/2009 हे अंशतः मंजुर करण्यात आले असून त्यांना 10 दिवसाचे आंत माहिती द्यावी असे आदेश झाले. अपील क्र. 580/2009, 572/2009 हे खारीज करण्यात आलेले आहे. आयोगाचे निर्णया प्रमाणे दि. 15.10.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी तथा सहा. सचिव म.रा.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली

आहे. व त्यामुळे त्याच अर्जाच्या संदर्भातील पुणे खंडपीठा कडील अपीलाची सुनावणी पुन्हा घेणे हे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 190/2010**

श्री हगरु राघोजी कापगते
रा. पो. सेंदुरवाफा
ता. साकोली जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एन. के. हिरेखण
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक
पोलीस अधिक्षक कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री यु. एस. लांडगे
जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार
पोलीस स्टेशन डुग्गीपार
ता. सडक/अर्जुनी जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस स्टेशन इन्स्पेक्टर डुग्गीपार ता. सडक/अर्जुनी जि. गोंदिया यांचेकडे दिनांक 26.10.2006 चे रिपोर्टवर राज्य माहिती आयुक्त यांचे निर्णयानंतर दिनांक 25.2.2008 ला कारवाई करण्यात आलेली आहे. परंतु त्या निर्णया प्रमाणे कारवाई कां करण्यात आली नाही व विलंब का झाला व त्यानंतरच बयाण का घेतले त्याची माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 9.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 11.12.2009 ला आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2009 रोजी दाखल केलेल्या अर्जामध्ये राज्य माहिती आयोगाचे निर्णया पुर्वी कारवाई कां करण्यात आली नाही असे कारण दिलेले आहे. त्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 19.5.2009 रोजीच सर्व कागदपत्रे दिलेली आहेत असे आयोगाकडे सांगितले. अपील क्र. 641/2008 मध्ये सुध्दा माहिती पुरविलेली असल्यामुळे खारीज करण्यात आलेले आहे असा निर्णय दिलेला आहे. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा स्वयंस्पष्ट आहे. व आयोगापुढे खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

अर्जदारानी मौजा मालीजुंगा येथील गट क्र. 212,217,182 या शेतजमीनीचे वाद असल्याने दि. 26.10.06 ला पो.स्टे.डुग्गीपार येथे अर्ज दिला होता या दिलेल्या अर्जावर पोलीसाकडून काय कारवाई करण्यात आली या मुद्याला धरुन केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळण्यास दि. 18.8.08 ला माहितीचा अधिकार अन्वये अर्ज सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार डुग्गीपार यांचेकडे अर्ज सादर केल्याने सदर प्रकरण चौकशीवर असल्याने कार्यवाही बाबत याच दरम्यान अर्जदाराने दि. 30.9.09 ला जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी यांचेकडे अर्ज सादर केला या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे जा.क्र.421/09 दि. 25.10.09 अन्वये अर्जदाराला लेखी सुचना देण्यात आली आहे.

अर्जदार याचे शेतीचे हक्क व ताबा यावरुन वाद असल्याने त्यांनी पुढे शांतता ठेवावी व अनुचीत प्रकार घडू नये याकरिता दोन्ही गटाला तटस्थ राहण्याकरीता कलम 149 सी आर पी प्रमाणे नोटीस बजावण्यात आली व चौकशी सुरु असतांना घेण्यात आलेल्या चार जवाबाच्या प्रती पुरवण्यात आल्या आहेत. त्याची पोच संलग्न आहे.

अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात जमीनीचे हक्क व ताब्यावरुन वाद असल्याने त्याचा निर्णय होण्याकरिता पो.स्टे.डुग्गीपार प्रस्ताव क्र.1/09 दि. 18.5.09 चे कलम 145 जा.फौ. प्रमाणे उपविभागीय दंडाधिकारी देवरी यांचेकडे पाठविण्यात आलेल्या असुन प्रकरण त्यांचेकडे न्यायाकरिता विचाराधीन आहे. या प्रकरणात केलेल्या चौकशीचे संपूर्ण कागदपत्र दि. 19.5.09 रोजी पुरविण्यात आलेले आहेत.

अर्जदारानी कागपत्र मिळाले नाही म्हणून या कार्यालयाकडे दि. 14.11.2009 चा अपील अर्ज सादर केल्याने अपील अर्जाचे सुनावणी करीता दि. 9.12.2009 ची तारीख नेमण्यात आली होती अर्जदारानी दिलेल्या तारखेवर हजर न होता दि. 10.12.2009 रोजी हजर झाल्याने जन माहिती अधिकारी व अर्जदार यांचे समक्ष त्यांचे म्हणणे एकुण प्रकरण हे शेतीचे मालकी हक्काबाबत असल्याने कलम 149 जा.फौ. प्रमाणे दोन्ही पार्टींना शांतता व सुव्यवस्था राखण्यासंबंधी नोटीस बजावण्यात आली चौकशी अंती कलम 145 जा.फौ. प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. अर्जदारास आमचे कार्यालयीन पत्र क्र. 1145/09 दि. 11.12.09 प्रमाणे निर्णयाची प्रत दि. 12.12.09 रोजी प्राप्त झाल्याच्या स्वाक्षरीची प्रत सोबत सलग्न आहे.

अर्जदारानी यापुर्वी आयोगाकडे अपील अर्ज केलेला होता अपील क्र. 641/08 प्रमाणे सुनावणी ता. 7.5.09 रोजी त्यावर आयोगाने निर्णय घेवून अर्जदारास कागदपत्र पुरविले असल्याने अर्जदाराची अपील खारीज केलेली आहे.

अर्जदारानी केलेली तक्रार ही शेतीचे हक्क व ताब्यावरुन असल्याने प्रकरण अदाखलपात्र व दिवाणी स्वरुपाचे असुन महसुल विभागाशी निगडीत आहे. यापुर्वी अर्जदारास कागदपत्र देण्यात आले आहेत. म्हणुन अर्जदारानी केलेला अर्ज खारीज करण्यास पात्र आहे.

यावरुन अपीलकर्ता यांनी विचारलेली कारणे हे माहिती या व्याख्येत येत नाही. परंतु त्यांना सर्वच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 191/2010**

श्री जगन्नाथ बळवंतराव दलदले
प्लॉट क्र. 12 अयोध्यानगर न्यु सुभेदार रोड
गल्ली क्र. 3 अयोध्यानगर नागपूर 440024 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षी
नागपूर वन विभाग नागपूर
सिव्हील लाईन नागपूर 440001
2) श्री एन. टी. जयस्वाल
जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी
वन परिक्षेत्र विभाग रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी वन परिक्षेत्र विभाग रामटेक यांचेकडे पर्यावरणाचा विचार न करता आंब्याची झाडे तोडण्याची परवानगी दिल्याबद्यल व भागधारकांना डावलण्याबाबत सन 2008 या वर्षाची माहिती त्याकरीता दि. 14.10.2009 ला दिलेल्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती एकुण दहा मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 29.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय देण्यात आला नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 21.11.2009 रोजी माहितीचा अर्ज आयोगाचे कार्यालयात पाठविले. तो रजिस्टर पोस्टालने पाठविलेले आहे. व त्याबबतची पोच त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणली व छायांकित प्रती, कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तरी सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरच्या अर्ज त्यांचे कार्यालयात प्राप्त नाही. परेतू सदरची नोंदणीकृत पावती असल्यामुळे त्यांनी अर्ज पाठविलेला होता हे मान्य करावे लागते. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात नोंद करण्यात आलेली नाही. मात्र त्याकरीता जन माहिती अधिकारी किंवा कार्यालय प्रमखानी आवक जावक नोंदवहीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पुरावा सादर केलेला नाही. यावरुन सदरच्या अर्जाची नोंद केलेली दिसून येत नाही. तशी केलेली नसल्यास संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द कार्यवाही करणे आवश्यक राहिल. त्याकरीता संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी हे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 250/- च्या शास्तीस पात्र आहे. ती त्यांचे दरमहाचे वेतनातून वसेल करणे आवश्यक राहिल. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुध्दा

प्रथम अपील मिळाले नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्याबाबत सुध्दा अपीलकर्ता यांनी डाक प्रमाणीकरण दिलेले आहे. यावरुन त्यांचे कार्यालयात सुध्दा माहितीचे अर्ज घेत नाही असे दिसून येते. मात्र आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी अपलीाच्या सुनावणीची नोटिस काढण्यात आल्यानंतर दि. 17.3.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असे सांगितले. व तसा खुलासा आयोगाकडे करण्यात आलेला आहे. जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराने की माहिती मागितली त्यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याबद्यलची कोणतीही माहिती दिसून येत नाही. राज्य माहिती आयोग हे कोणतीही माहिती मागत नाही. तरीही राज्य माहिती आयोगाची नोटिस न वाचता अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे मुद्येनिहाय खुलासे आयोगाकडे केलेले आहे. याचा अर्थ जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे दोन्ही जबाबदार आहेत असे दिसून येते. व हे अर्ज सुध्दा त्यांचेकडे प्राप्त झाले असावेत असे गृहीत धरायला हरकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 20.11.2009 च्या अर्जाच्या मुद्येनिहाय माहिती कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता यांचा दि. 20.11.2009 चा अर्ज प्राप्त न झाल्याच्या संदर्भामध्ये परंतू अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या पुराव्यावरुन अर्जाची नोंद झालेली नसल्यामुळे संबंधित आवक जावक लिपीक यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 250/– ची शास्ती लादण्यात येते. त्याबाबत आधी जबाबदारी निश्चित करावी व ज्या कर्मचा–यावर जबाबदारी निश्चित झाली असेत त्यांचे वेतनातून शास्तीची रक्कम वसुल करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 188/2010**

श्री सुरेश शामरावजी गजरे
रा. धाडी पो. साहूर
ता. आष्टी जि. वर्धा 442202 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. एस. जुनगरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी
कृषी विभाग आष्टी
ता. आष्टी जि. वर्धा
2) श्री व्ही. के. कहुरकर
जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी कार्यालय आष्टी
ता. आष्टी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.11.2009 रोजी संपूर्ण माहिती मिळालेली आहे व त्यांचे समाधान झालेले असून कोणतीही तक्रार नाही असे तालुका कृषी अधिकारी यांना लेखी दिलेले असून सुध्दा त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. व द्वितीय अपीलाच्या सुनावणीस आजे ते हजर झाले नाही. याचा अर्थ अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यांनी दिलेले लेखी उत्तर योग्य आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती मिळाली असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 193/2010, नाग 194/2010, नाग 195/2010, व नाग 196/2010,**

श्री विजय शंकरराव आंभोरे
51 बी पांडे लेआऊट खामला नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक नाग 193/2010, नाग 194/2010</u>**
1) श्री एस. एच. गुज्जलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
सदर नागपूर
2) श्री एस. यु. देव
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (नि.)
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
सदर नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक नाग 195/2010, नाग 196/2010</u>**
1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त
नागपूर महानगर पालिका नागपूर
2) श्री दिगांबर मेहर
जन माहिती अधिकारी तथा सहा. संचालक
नगर रचना विभाग नागपूर महानगर पालिका
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या चारही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. नाग 193/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 27.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे आयुक्त मनपा, नागपूर यांना

दिलेल्या पत्र क्र. टी.पी.एस./2406/1383 प्र.क्र. 239/2007 नवि–नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई 32 यांनी दि. 30 जुन 2008 तसेच श्री महेशकुमार पांडे यांचे तर्फे आममुखत्यार विजय शंकरराव आंभोरे यांनी दिलेले दि. 6.11.2008 चे पत्र आणि श्री महेशकुमार पांडे यांचे तर्फे ॲड. डॉ. अंजन डे यांनी दि.29.11.2008 रोजी दिलेली कायदेशिर नोटिस यावर नासुप्र नागपू ने आतापर्यंत काय कारवाई केली याची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 24.9.2009 रोजी संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की आपण मागितलेली माहिती अभिलेखात दस्तऐवज स्वरुपात उपलब्ध नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 23.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.11.2009 रोजी देण्यात आला असून दि. 30.11.2009 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांना उल्लेखित केलेले कालावधीचे आवक जावक रजिस्टर निरीक्षणार्थ उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय दिलेला आहे. अभिलेखामध्ये तपासले असता या संबंधीत कालावधीतील आवक जावक रजिस्टर उपलब्ध होवू शकले नाही. तरी वरील अपील निर्णयाप्रमाणे हयांची नोंद घ्यावी तसेच ही माहिती आपण मला प्रत्यक्ष भेटले असता मी आपणास दिलेली आहे हे लक्षात घ्यावे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे नाही महानगर पालिकेकडे हस्तांतर केले आहे असे सांगते व महानगर पालिका सदरची माहिती नागपूर सुधार प्रन्यास कडे आहे त्यांचेकडे नाही असे सांगते. परिणामी मला मात्र माहिती उपलब्ध होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या अधिकारात आवक जावक रजिस्टर नाही. अपीलकर्ता यांना आयुक्त महानगर पालिका यांना पाठविलेल्या पत्रावरील कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यास कडे मागितलेली आहे. परंतू ती नागपूर सुधार प्रन्यास कडे मिळू शकणार नाही कारण ती त्यांची माहिती नाही. मात्र उर्वरीत दोन मुद्यांचे संदर्भामध्ये नागपूर सुधार प्रन्यासने काय कार्यवाही केली ही माहिती टिपणीच्या स्वरुपात किंवा निर्णयाच्या स्वरुपात केलेली नसेल तर त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतू आवक जावक रजिस्टरच उपलब्ध नाही अशा प्रकारची निरर्थक माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर सदरचे आवक जावक रजिस्टर उपलब्ध करुन घेण्याकरीता प्रथम अपीलीय अधिकारी हे त्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे त्यांनी संबंधित पोलीस स्टेशनकडे महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम 2005 च्या कलम 9 प्रमाणे एफ. आय. आर. दाखल करणे आवश्यक आहे. त्यातून जबाबदारी निश्चित होवून अभिलेख जतन करुन ठेवणे याची जाणीव कर्मचारी व अधिकारी यांना होईल व नागरीकांना माहितीसुध्दा उपलब्ध होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. नाग 194/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 27.8.2009 रोजी नागपूर सुधार प्रन्यासने दि. 27.2.2002 पासून 30.6.2002पर्यंत मंजुर केलेले इमारती नकाशे आणि परवाने (विकास नियोजन प्राधिकरणाचा दर्जा संपुष्टात आल्यानंतर) किती इमारतीचे नकाशे मंजुर करण्यात आले आहेत यांची यादी मालकासहित द्यावी अशी माहिती व्यक्तिशः मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 24.9.2009 रोजी मागितलेली माहिती ही कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नाही कारण ही अभिलेखे महानगर पालिकेस हस्तांतरीत केलेली आहेत. त्यामुळे आपण मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी अपीलकर्ता यांनी दि. 15.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.11.2009 रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून 10 दिवसाचे आंत माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (नि.) यांचेकडे जावून संबंधित रजिस्टरचे निरीक्षण करावे व अपीलार्थीस अभिप्रत दस्ताऐवज विनामुल्य उपलब्ध करुन द्यावेत असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतू त्याबाबत रजिस्टरच उपलब्ध नाही अशाप्रकारचे उत्तर अपीलकर्ता यांना दिलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की दि. 15.11.2003 ला कार्यकारी अभियंता मुख्यालय नागपूर सुधार प्रन्यास यांनी सहा. संचालक नगर रचना महानगर पालिका यांना पत्राच्या सोबत सर्व फाईल हे हस्तांतरण केलेले आहे. ते रजिस्टर हे आयोगाचे निरीक्षणास आणले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही बरोबर आहे असे दिसून येते. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर पुन्हा दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणजे अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णया प्रमाणे सुध्दा माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे. जे रजिस्टर आयोगास दाखविण्यात आले ते रजिस्टर उपलब्ध नाही असे अपीलकर्ता यांना कळविणे म्हणजे त्यांची दिशाभूल करणे हे होय व त्याकरीता संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय्य जन माहिती अधिकारी यांनी घेतले असेल त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

6. अपील क्र. नाग 195/2010 व अपील क्र. नाग 196/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 27.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. संचालक नगर रचना आणि आयुक्त नागपूर महानगर पालिका नागपूर यांनी दिलेल्या पत्र क्र. टी.पी.एस. /2406/1383 प्र.क्र. 239/2007 नवि–नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई 32 यांनी दि. 30 जुन 2008 तसेच श्री महेशकुमार पांडे यांचे तर्फे आममुखत्यार विजय शंकरराव आंभोरे यांनी दिलेले दि. 6.11.2008 चे पत्र आणि श्री महेशकुमार पांडे यांचे तर्फे ॲड.

डॉ. अंजन डे यांनी दि.29.11.2008 रोजी दिलेली कायदेशिर नोटिस यावर नासुप्र नागपू ने आतापर्यंत काय कारवाई केली याची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 22.9.2009 रोजी उपरोक्त संदर्भांकित पत्रामध्ये नमुद तारखेला दिलेला अर्ज कार्यालयातील आवक रजिस्टर मध्ये पडताळणी केली असता प्राप्त झालेला नाही. त्यामुळे अर्जावर कार्यालयाने काय कार्यवाही केली ही माहिती देता येणे शक्य नाही तसेच नागपूर सुधार प्रन्यासने दि. 27.2.2002 पासून 30.6.2002पर्यंत नागपूर सुधार प्रन्यासचा विकास नियोजन प्राधिकरणाचा दर्जा संपुष्टात आल्यानंतर किती इमारतीचे नकाशे मंजुर करण्यात आले आहेत यांची यादी मालकासहित द्यावी. परंतू अर्जाच्या संदर्भामध्ये वरील कालावधीचे परमीट रजिस्टरची अभिलेख विभागात पडताळणी चालू आहे. रजिस्टर उपलब्ध झाल्यास आपणास माहिती देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. दोन्ही निर्णया प्रमाणे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 15.10.2010 रोजी प्रथम अपीले दाखल केली. प्रथम अपीलामध्ये सदरहू माहिती ही संबंधित अर्ज सा. प्र. वि. कडे विचारणा करावी व माहिती घेवून अर्जदाराला 15 दिवसात कळवावी असे आदेश दिलेले दिसून येतात. दुस–या प्रथम अपीलामध्ये विभागाने 8 दिवसात अर्जदारास निश्चित कळवावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतर सा. प्र. वि.स दि. 13.11.2009 ला पत्र पाठविले. व त्यातून सदरहू तीनही पत्रावर त्याबाबत कार्यवाही केलेली नाही. सदरहू प्रकरण नागपूर महानगर पालिकेच्या विचाराधीन असून अद्याप निर्णय घेतलेला नाही असे दि. 3.4.2010 ला अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. व दुस–या अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दि. 23.12.2009 रोजी अभिलेख विभाग नगर रचना विभाग महानगर पालिका नागपूर यांच्या माहिती नुसार वरील कालावधीचे परमीट रजिस्टर नागपूर सुधार प्रन्यासने महानगर पालिकेस हस्तांतर केले नसल्यामुळे आपण मागणी केलेली माहिती देता येणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल झालेली आहेत.

7. दोन्ही द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांना विहित मुदतीत उपलब्ध झाली करुन दिलेली नाही व त्यांना द्वितीय अपीले करुनच उत्तरे दिलेली आहेत. अपीलकर्ता यांनी सुध्दा आयोगापुढे पुन्हा युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी एकच माहिती नागपूर सुधार प्रन्यासकडे व महानगर पालिकेकडे मागितलेली आहे. परंतू दोन्ही प्राधिकरणे ही माहिती देण्याची टाळाटाळच करीत आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्याप्रमाणे उत्तरे देण्यात आली. परंतू जन माहिती अधिकारी यांनी दिलेली उत्तरे तपासून पाहता असे दिसून येते की ती सर्व उडवाउडवीची उत्तरे आहेत. कोणत्याही प्रकारचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये सा.प्र.वि.कडे माहिती आहे व त्यांना पत्र दिल्यानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न झालेला नाही. अ.क्र.

193/2010 मध्ये माहिती अधिकारी यांनीच सदरचा अर्ज सा.प्र.वि.कडे हस्तांतर करणे आवश्यक होते. प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा आदेश झाल्यानंतर विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र आयोगाची नोटिस मिळाल्यानंतर मात्र सा.प्र.वि.कडून माहिती उपलब्ध करुन घेवून ही अपीलार्थीला देण्यात आलेली आहे. दुस–या अर्जाच्या संदर्भामध्ये मात्र नागपूर सुधार प्रन्यासकडून दि. 27.2.2002 पासून 30.6.2002पर्यंतच्या कालावधीतील नस्त्याच हस्तांतरीत झालेल्या नाहीत. अशीच खोटी माहिती अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दिली ही बाब वरील अ.क. 194/2010 मध्ये दिनांक 24.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास यांनी अपीलकर्ता यांना कळविलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाच्या सुनावणीत सुध्दा आयोगाच्या निदर्शनास आलेले असल्यामुळे ती दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिली आहे हे सिध्द होते व त्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा त्यांनी सदरची माहिती माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता ज्यांचे सहाय्य घेतले असेल असे अधिकारी किंवा कर्मचारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक ठरते व त्याकरीता अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही मंजुर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपील क. नाग 193/2010 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम 2005 च्या कलम 9 प्रमाणे संबंधित पोलीस स्टेशनकडे अभिलेख गहाळ झाल्याच्या संदर्भामध्ये एफ. आय. आर. दाखल करावी.
2) अपील क. नाग 193/2010 हे मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार रजिस्टर उपलब्ध असून सुध्दा उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
3) अपील क. नाग 194/2010 व अपील क. नाग 195/2010 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत दिशाभूल करणारी माहिती दिली व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांनी ज्या अधिकारी व कर्मचारी यांचे माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता कलम 5 (4) प्रमाणे सहाय्य घेतले असेल त्यांना कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) अन्वये जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

3) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **<u>आयुक्त नागपूर महानगर पालिका नागपूर</u>** यांनी करावयाची असल्यामुळे त्यांचेकडे सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 153/2010**

श्री राधेशाम सदाशिव पटिये
343 नवि शुक्रवारी सिमेंट रोड महाल नागपूर
ता. जि. नागपूर 32 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. उपायुक्त –1
नागपूर महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
जलप्रदाय विभाग महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे नवीन नळ कनेक्शन जोडणी करुन मिळण्याबाबत तक्रारीच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 7.10.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती तयार असून अतिरिक्त खर्चाचा भरणा रु. 24/– चा करावा व माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केला नाही व प्रथम अपील दि. 4.10.2009 रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 12.11.2009 रोजी देण्यात आला असून विभागाने माहिती 30 दिवसात दिली नसल्यास माहिती मोफत 3 दिवसात द्यावी व उपलब्ध नसलेली माहिती 8 दिवसात शोध घेवून जावी व उपलब्ध होत नसल्यास तसे कळवावे असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतू अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता गैरहजर आहे परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. नळ

कनेक्शन जोडणी करुन देण्यात आलेली आहे. मात्र मेसर्स बंबी ॲन्ड वर्मा हॉस्पीटल यांना नळ जोडणी जी दिलेली आहे त्या संदर्भातील उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मेसर्स बंबी ॲन्ड वर्मा हॉस्पीटल यांच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध असेल ती कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord६.६४७-६४८

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 152/2010**

श्री अशोक मारोतराव रामटेके
वार्ड नं. 5 खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव
श्रीमती माधुरीताई देशमुख शिक्षण संस्था खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री गेडाम
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
इंदिरा अध्यापक विद्यालय खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र. 173/2009 हे दाखल केलेले होते. व त्या संदर्भात निर्णय सुध्दा झालेला आहे. त्यामुळे पुन्हा त्याच संदर्भात अपीलाची सुनावणी घेणे हे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 151/2010**

श्री प्रकाश रामकृष्णजी वाकोडे
मु. पो. वाकी
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एन. व्ही. बुटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री जे. व्ही. डवरे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत वाकी
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत यांचेकडे सहपत्रामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 9.10.2009 रोजी अपीलकर्ता यांना रु. 1950/– चा भरणा करावा असे कळविण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 23.10.2009 रोजी पुन्हा 6 मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असे स्पष्टीकरण देणारे पत्र देवून शासन दर किती आहे व प्रति किती आहेत याबाबतचा खुलासा द्यावा अशी माहिती मागितलेली दिसून येते. परंतू त्याप्रमाणे खुलासा न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 18.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण किंवा त्याच माहितीच्या पृष्ठाच्या बाबतचे विवरण दिलेले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 25.10.2009 रोजी संपूर्ण खर्च व पृष्ठाचे विवरण दिलेले आहे. मात्र ग्रामपंचायत चपराशी श्री सहारे हा त्यांचेकडे

सदरचे पत्र घेवून गेले असता सदरचे पत्र घेण्यास नकार दिला. व त्याबद्यलचा पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतू खर्चाचा भरणा न झाल्यामुळे माहिती अपीलकर्ता यांना पुरविता आलेली नाही असे दिसून येते. त्याकरीता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील एकूण पृष्ठे व प्रति पृष्ठ रु. 2 प्रमाणे खर्चाचा तपशिल अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहिल. व त्याप्रमाणे खर्चाचा भरणा केल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता सदरचे अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे पुर्नसुनावणी करीता पाठविणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे पुर्नसुनावणी करीता प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून योग्य ते स्पष्टीकरण करुन अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा करुन घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 154/2010

श्री प्रफुल्ल केवळराम मस्के
के.ऑफ ठोंबरे प्लॉट नं. 23 गल्ली नं. 11
विश्वकर्मानगर वार्ड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुनिल वारे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विषेश जिल्हा समाज कल्याण अधिकारी
नागपूर ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय नरसाळा नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य गैरहजर आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा संचालक प्राचार्य पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून सन 1998–99 या कालावधीतील एकुण 9 प्राध्यापक व कर्मचारी यांच्या नियुक्ती आदेशाच्या प्रति मागितलेल्या दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 9.10.2009 रोजी आपण मागितलेली माहिती या अगोदर अनेक वेळा उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी या प्रती सोबत पुन्हा पाठवित आहे असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 21.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.12.2009 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य उपस्थित न राहिल्यामुळे एकतर्फी निर्णय घेवून सदर अपील प्रकरण निकाली काढण्याच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यावर 10 दिवसाचे आंत अर्जदारास परस्पर कळवून अर्जदारानी मागितलेली माहिती उपलब्ध

करुन देण्याबाबत याद्वारे आदेश निर्गमित करुन सदर प्रकरण निकाली काढण्यात आले असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि. 13.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना फक्त 11 शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–याची नियुक्ती 1998–99 या वर्षामध्ये करण्यात आलेली आहे अशी माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहितीच्या अर्जासोबत जी यादी दिलेली आहे त्या यादीतील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचा–याची नावे हुद्या व नियुक्ती दिनांक देवून नियुक्ती आदेश मागितलेले होते. परंतू अपीलकर्ता यांचे दि. 9.11.2009 च्या पत्रा सोबत कोणत्याही प्रकारचे आदेशाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या नाहीत व त्यामुळे त्यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीस सुध्दा ते हजर झालेले नाहीत. व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशा नंतर जी माहिती माहितीच्या अधिकारात नमूद केलेली आहे तीच माहिती शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–याच्या संदर्भात पुन्हा त्यांना देण्यात आलेली आहे. यावरुन अपीलीय अधिकारी यांच्या आदेशा प्रमाणे सुध्दा त्यांनी नियुक्ती आदेशाच्या प्रती त्यांना दिलेल्या नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळच केलेली आहे व जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती दिशाभूल करणारी असून अपीलकर्ता यांच्या अर्जात नमुद केलेली माहितीच पुनरपी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य हे अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये माहिती देण्याची टाळाटाळ करीत आहे अशी आयोगाची खात्र झालेली असल्यामुळे यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/– ची शास्ती लादणे आवश्यक आहे. कलम 20 (1) च्या परंतुकाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकुन घेणे बंधनकारक आहे. परंतु आयोगाच्या नोटिसीमध्ये स्पष्टपणे त्याबाबत आदेश दिलेले आहेत. व त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी सुध्दा देण्यात आलेली आहे. व त्यांनी काहीही न कळविता तशी संधी गमाविलेली आहे व ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीस सुध्दा ते काहीही न कळविता गैरहजर राहिलेले आहे. या प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयातून सिध्द होते. व त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादणेचा निर्णय करणे आवश्यक आहे. तसेच माहिती उपलब्ध करुन दिली नाही याकरीता सुध्दा अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने नियुक्ती आदेशाच्या छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात याव्या. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द रु. 25000/– ची शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 16.9.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे व त्याकरीता खोटी व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणेरु. 25000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी करावयाची असून त्यांच्या आदेशाचे पालन केले नाही म्हणून सुध्दा प्रशासकीय कार्यवाही करावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

Ageyord६.६५३-६५५

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 150 2010**

श्रीमती करिश्मा गो. गलानी
404 हिमालय–2, आंबेडकर चौक
सेंन्ट्रल ऐवेन्यू लकडगंज नागपूर
ता. जि. नागपूर 8 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य. विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती सुजाता रेवतकर
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
हिंदुस्थान विद्यालय लकडगंज नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडे एकुण चार मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 19.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचा अर्जच त्यांचेकडे प्राप्त नाही. व जे पाकीट आलेले आहे त्या पाकीटामध्ये अर्ज नसून हॅपी न्यु इयर अशा प्रकारे कागद त्यांना प्राप्त झालेले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये मात्र तो अर्ज त्यांना प्राप्त झाला व त्या अर्जाप्रमाणे दि. 5.9.2009 च्या पत्रान्वये दस्तऐवजाच्या झेरॉक्सच्या खर्चाबाबत रक्कम जमा करण्याबाबत पत्र देण्यात आले. अर्जदारानी दि. 29.4.2009 ला पैशाचा भरणा केला. पुन्हा प्रथम अपील मागे घेण्यासाठी दि. 18.5.2009 ला पत्र दिले. तरी सुध्दा दि. 16.1.2009 ला सुनावणीच्या वेळी माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती घेवून जाण्याबाबत अर्जदाराला जा.क्र.

196/2009 दि. 14.11.2009 ला पत्र देण्यात आले. दि. 10.3.2010 ला रजिस्टर करण्यात आले. अर्जदाराने दि. 4.2.2010 ला पोलिस स्टेशन लकडगंज येथे माहितीच्या अधिकार संदर्भात पैसे परत करण्याबाबत तक्रार केली. अर्जदार त्यांच्या विद्यालयात नोकरीत आहे. व त्यामुळे त्यांना वारंवार पत्राद्वारे सुचना केलेल्या आहेत. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना माहितीची आवश्यकता नाही. पैसे मिळाले तरी चालेल. परंतू जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी छायांकित प्रती हया काढून खर्च केलेला आहे. त्यामुळे पैसे परत करता येणार नाही. मात्र अपीलकर्ता यांनी असे सांगितले की जो खर्च त्यांनी आकारलेला आहे तो अवाजवी आहे. त्यावर पुरविण्यात येणा–या माहितीच्या पृष्ठांची संख्या 168 आहे. व खर्चाचा भरणा मात्र रु. 950/– करण्यात आलेला आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की प्रत्येक पृष्ठ हे दुप्पट आकाराचे आहेत व त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. परंतू रु. 300/– हे त्यांना परत करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी. व रु. 300/– हे त्यांना परत करण्यात यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 189/2010

श्री हगरु राघोजी कापगते
रा. पो. सेंदुरवाफा
ता. साकोली जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. पी. जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
देवळी ता. देवळी जि. गोंदिया
2) श्री एन. जे. उईके
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
सडक/अर्जुनी
ता. सडक/अर्जुनी जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार सडक/अर्जुनी यांचेकडे राज्य माहिती आयोग विदर्भ क्षेत्र यांचे अपील क्र. 309/2008 चे निर्णयानुसार दि. 1.4.2009 चे आदेश पारीत नुसार खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मौजा माहीजुंगा प.ह.नं. 1 ता. सडक/अर्जुनी जि. गोंदिया येथील रेव्हेन्यु रेकॉर्डची माहिती गट नं. 212,213,217,218,216,219,220,221 आणि ग.नं. 97अ, 397 ब चे 7/12 चे उतारे, व सदर सर्व गटाचे फेरफार पंजीची नक्कल प्रत ची माहिती राज्य माहिती आयोग विदर्भ क्षेत्र यांचे अपील क्र. 309/2008 चे निर्णय दि. 1.4.2009 नुसार वरील तपशिल माहिती संपूर्ण हवी आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 9.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.11.2009 रोजी देण्यात आला असून अर्जदारानी या कार्यालयात दिलेले अपील अर्ज यासोबत आपणाकडे पाठविण्यात येत आहे. आपण त्यांनी दिलेल्या प्रथम अर्जावर सविस्तर चौकशी करुन दिलेल्या मुदतीचे आंत अर्ज निकाली काढावे असे आदेश

तहसिलदार यांना उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले दिसून येता. त्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अपीलाच्या संदर्भात निर्णय न दिल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती अद्याप पर्यंत त्यांना मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता त्यांना दि. 9.10.2009 रोजी आपण मागितलेल्या माहितीच्या अधिकारा अंतर्गत आपले अर्ज दि. 29.9.2009 ची तलाठी साझा क्. 2 कडून उपलब्ध झालेली असून ती स्वतः कार्यालयात येवून दि. 12.10.2009 ला घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर कोतवाल यांचा शेरा दिसून येतो. दि. 11.10.2009 ला ते उपलब्ध नव्हते व दि. 18.10.2009 ला हजर मिळाले. नोटिस घेण्यास इंकार केला मला पूर्ण माहिती पाहिजे म्हणून नोटिस घेतला नाही. तसेच आयोगापुढे त्यांनी असे सांगितले की त्यांना आतापर्यंत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 189/2010

श्री हगरु राघोजी कापगते
रा. पो. सेंदुरवाफा
ता. साकोली जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. पी. जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
देवळी ता. देवळी जि. गोंदिया
2) श्री एन. जे. उईके
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
सडक/अर्जुनी
ता. सडक/अर्जुनी जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार सडक/अर्जुनी यांचेकडे राज्य माहिती आयोग विदर्भ क्षेत्र यांचे अपील क्र. 309/2008 चे निर्णयानुसार दि. 1.4.2009 चे आदेश पारीत नुसार खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मौजा माहीजुंगा प.ह.नं. 1 ता. सडक/अर्जुनी जि. गोंदिया येथील रेव्हेन्यु रेकॉर्डची माहिती गट नं. 212,213,217,218,216,219,220,221 आणि ग.नं. 97अ, 397 ब चे 7/12 चे उतारे, व सदर सर्व गटाचे फेरफार पंजीची नक्कल प्रत ची माहिती राज्य माहिती आयोग विदर्भ क्षेत्र यांचे अपील क्र. 309/2008 चे निर्णय दि. 1.4.2009 नुसार वरील तपशिल माहिती संपूर्ण हवी आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 9.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.11.2009 रोजी देण्यात आला असून अर्जदारानी या कार्यालयात दिलेले अपील अर्ज यासोबत आपणाकडे पाठविण्यात येत आहे. आपण त्यांनी दिलेल्या प्रथम अर्जावर सविस्तर चौकशी करुन दिलेल्या मुदतीचे आंत अर्ज निकाली काढावे असे आदेश

तहसिलदार यांना उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले दिसून येता. त्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अपीलाच्या संदर्भात निर्णय न दिल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती अद्याप पर्यंत त्यांना मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता त्यांना दि. 9.10.2009 रोजी आपण मागितलेल्या माहितीच्या अधिकारा अंतर्गत आपले अर्ज दि. 29.9.2009 ची तलाठी साझा क्र. 2 कडून उपलब्ध झालेली असून ती स्वतः कार्यालयात येवून दि. 12.10.2009 ला घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर कोतवाल यांचा शेरा दिसून येतो. दि. 11.10.2009 ला ते उपलब्ध नव्हते व दि. 18.10.2009 ला हजर मिळाले. नोटिस घेण्यास इंकार केला मला पूर्ण माहिती पाहिजे म्हणून नोटिस घेतला नाही. तसेच आयोगापुढे त्यांनी असे सांगितले की त्यांना आतापर्यंत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord६.६६१-६६२

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 55/2010

श्री वामन निळकंठ देशपांडे
एम.आय.जी.24/4 भामटी परसोडी
हाऊसिंग बोर्ड कॉलनी त्रिमुर्ती नगर
रिंग रोड नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री राठोड
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर .... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 3.5.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांना माहिती मिळालेली आहे परंतू त्यांना कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते. व त्यामुळे ते गुणवत्तेच्याबाबत त्यांनी 1998 पासून आजपर्यंत सांख्यिकी मुद्दे दुरुस्ती करुन मिळावी अशी त्यांची मागणी दिसून येते. परंतू तक्रारदार यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की त्यांना माहिती दिलेली आहे. परंतू ती टिप्पणी दिलेली नाही. तरी त्यांना टिप्पणी उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले आहे तशी ती त्यांनी द्यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord६.६६२-

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 292/2009**

श्री होमराज केशवराव खुसपरे सचिव
ओम साईनाथ बाबा ग्रामीन विकास
शिक्षण विद्या प्रसारक मंडळ वाकी
ता. सावनेर जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 3.5.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 8.10.2009 रोजी अपील क्र. 166/2009 च्या निर्णय दि. 5.5.2009 प्रमाणे माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली आहे. त्यावर आयोगाचे कार्यालयातून खुलासा मागविण्यात आला होता. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना सर्व रजिस्टर दाखविण्यात आले आहे असे कळविण्यात आले होते असे गेरतक्रारदार यांनी आयोगाकढे सांगितले. व सर्व रजिस्टर मध्ये अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेले दस्तऐवजाची नोंद नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दस्तऐवजाच्या नोंदीचे रजिस्टर दाखविण्यात आले. परंतू गेरतक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की असे कोणत्याही प्रकारचे वेगळे रजिस्टर नसते. सर्व आवक जावक रजिस्टर एकच असते. व त्यात दस्तऐवजाची नोंद नसेल तर ते प्रस्ताव आले नाही तेव्हा तत्कालीन अधिका–यानी नोंद केली किंवा नाही यापलीकडे काहीही माहिती त्यांना सांगता येणार नाही त्यामुळे अपीलकर्ता यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार कमांक 42/2010**

श्री चंद्रभान सिताराम बारापात्रे
299 ओम नगर नागपूर 440009 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी लिमिटेड उपविभाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **गैर तक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 3.5.2010 )**
**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 26.11.2009 रोजी त्यांच्या तक्रारीच्या दि. 4.11.2009 च्या अनुषंगाने लेखा अधिका–याबरोबर बैठक करुन निर्णय दिला नाही व त्यांना माहिती उपलब्ध झाली करुन दिली नाही अशी तक्रार केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना विजेचे देयकातील सर्व माहिती समजावून सांगितली आहे. त्यांना आतापर्यंत कागदपत्रे व नियमाच्या प्रती दिलेल्या आहेत. परंतू त्यांची देयके चुकीची आहे व त्यामध्ये तफावत आहे व ती दुरुस्ती करुन मिळावी अशी त्यांची मागणी दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदीप्रमाणे कागदपत्रे उपलब्ध होतात व त्यांना सर्व कागदपत्रे उपलब्ध झाली आहे. त्यातून त्यांनी निष्कर्ष काढून स्वतंत्रपणे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदीप्रमाणे कोणतीही कार्यवाही करुन मिळत नाही. सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord६.६६६-

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 316/2010**

श्री सचिदानंद नथ्थुजी लोखंडे
संघर्ष 58 मोहगाव (झिलपी)
ता. हिंगणा जि. नागपूर 441110 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागपूर
2) श्री ए. एस. वाडेकर
जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.12.20090 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका भूमी अभिलेख यांचेकडे सन 1911–12 चे बंदोबस्त मिशल मधिल शेतजमिनीच्या दस्तऐवजाची व पूर्ण नकाशाची छायांकीत प्रत मिळणेबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.1.2010 रोजी अपीलकर्ता यांना सदरच्या नकलेकरीता आपणास बंदोबस्त मिशलचे एका नोंदीस 15 रु. याप्रमाणे तसेच नकाशाकरीता प्रत्येक नंबर करीता 15 रु. प्रमाणे जेवढे नंबर असतील तेवढी फी कार्यालयात भरावी लागेल. सदरची फी भरल्याशिवाय नक्कल देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दि. 18.1.2010 रोजी दारिद्रय रेषेखालील व्यक्तीकडून कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही याबद्यलची तरतूद माहिती अधिकारी यांचे निदर्शनास आणले. त्यावर दि. 20.1.2010 रोजी आपण मागितलेली माहिती वैयक्तीक कारणासाठी मागितली नसल्याचे दिसून येते. व त्यात पुन्हा त्यांना फी ची मागणी केलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 3.2.20090 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.3.2010 रोजी देण्यात आलेला असून महाराष्ट्र जमीन महसूल 1966 चे कलम 327 चे पोट कलम 8,9,10,11,12 अन्वये कळविले असून अर्जदार यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात नियमाप्रमाणे फी भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व त्याचप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या संदर्भामध्ये यशदानी नियम केलेल्या अहवालाची माहिती त्यांना दिली. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक हे त्यांना आवश्यक तेवढीच माहिती कधी मागत नाही. या अर्जदाराने सुध्दा संपूर्ण गावाच्या नकाशा सहीत बंदोबस्त मिशलची सर्व माहिती मागितली व ती अतिशय व्यापक प्रमाणात असल्यामुळे ती प्रति पृष्ठ 2 रु. नी देणे शक्य नाही. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नियम 5 च्या नियम 4 प्रमाणे विभागाने त्यांचेकडे नकाशा इतर माहिती देण्याकरीता नियम केले असतील तर त्या नियमाप्रमाणे खर्चाचा भरणा करण्यात यावा व जी माहिती प्रत्यक्ष तयार आहे त्या माहितीचे प्रति पृष्ठ 2 रु. प्रमाणे फोटोप्रत घ्यावी अशी तरतूद आहे. व त्यामुळे नियमाप्रमाणे खर्चाचा भरणा करावा असे त्यांनी कळविले होते. त्याहीपेक्षा त्यांना आवश्यक असतील त्या दस्तऐवजाचे निरीक्षण त्यांनी केल्यास त्यांना ती सन 1911—12 ची माहिती मिळू शकेल व तसे त्यांना सुचविण्यात आले होते. त्याप्रमाणे निरीक्षण घेण्यास अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशी तारीख व वेळ कळवून त्यांचेकडे उपस्थित राहून संबंधीत अभिलेखाचे निरीक्षण करावे. व त्यातून माहिती घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 326/2010

श्री जिवन विक्रम निकोसे
बी/2 अनमोल अपार्टमेंट मेकोसाबाग
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वि. वा. बोभाटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव (सेवा)
सार्वजनिक बांधकाम विभाग
मंत्रालय मुंबई 32
2) श्री दि. वा. दळवी
जन माहिती अधिकारी तथा उपसचिव (वि.चौ.)
सार्वजनिक बांधकाम विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.3.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे श्री जी.वी.निकोसे यांचे विरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. सन 2000 मध्ये मुख्य अभियंता सा.बां.प्रादेशिक विभाग नागपूर यांनी पाठविलेली पत्रे, विशेष चौकशी अधिकारी, विभागीय चौकश्याा, विभागीय आयुक्त कार्यालय यांनी सदर प्रकरणी सन 2001 मध्ये शासनास सादर केलेला विभागीय चौकशीचा अहवाल, त्या अहवालावर शासन करीत असलेल्या कार्यवाहीच्या कार्यालयीन टिप्पण्या, आणि त्यात नमूद केलेली सर्व दस्तऐवजांच्या प्रती. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 3.11.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 26.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.1.2010 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती पुरविण्यात आली आहे. तसा विभागीय चौकशीचा अहवाल वरील कार्यालयाने टिप्पणीच्या प्रती सदर

विभागीय चौकशीबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याने न देण्याचा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना अपूर्ण माहिती मिळाली व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (च) नुसार माहिती नाकारलेली आहे. सदरची तरतूद ही अपराध्याच्या संदर्भात आहे. मी अपराधी नाही. मी अपचारी आहे. त्यामुळे सदरची तरतूद विभागीय चौकशीच्या संदर्भात लागू होत नाही. परंतू सदरच्या युक्तीवादाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकढे असे सांगितले की मराठी भाषांतरामध्ये अपराध हा शब्द वापरलेला आहे. परंतू मूळ इंग्रजी प्रतीमध्ये प्रॉसीक्यूशन हा शब्द वापरलेला आहे. व प्रॉसीक्यूशनमध्ये विभागीय चौकशीचा समावेश होवू शकतो व त्यामुळे त्यांना तसे कळविण्यात आलेले आहे. कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक आहे. परंतू काही माहिती उपलब्ध करुन देता येत नसेल तर त्याकरीता अधिनियमाच्या कलम 8 मध्ये अपवाद करण्यात आलेला आहे. व त्या अपवादाच्या कलम 8 (1) (ज) प्रमाणे कळविलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णय योग्य आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

म 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 327/2010

श्री पुरुषोत्तम मारोतराव नंदेश्वर
थ्वक्रमशिला नगर बोधिसत्व, बुध्द विहाराजवळ
सिंदी(मेघे) वर्धा जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(क.व.औ.स.)
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतुक भवन
डॉ. आनंदराव नायर मार्ग
सेंट्रल मुंबई 400008
2) श्री इ. एफ. परब
जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतुक भवन
डॉ. आनंदराव नायर मार्ग
सेंट्रल मुंबई 400008 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी यांचेकडे दि. 4.10.2009 ला झालेल्या वि.क.अ. पदाच्या स्वतःची व क्र. 3, 14,21,33,35 च्या उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रती तसेच स्वतःच्या प्रत्येक प्रश्नाचे मिळालेले मार्क आदर्श उत्तर पत्रिकेची छायांकित प्रत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.11. 2009 रोजी अपीलकर्ता यांना तीन मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 22.2.2010 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असा निर्णय देवून अपील खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी स्वतःच्या उत्तर पत्रिकेची माहिती व इतरांच्या उत्तर पत्रिकेची छायांकित प्रती मागितलेली होती. परंतू ती त्यांना अधिनियमच्या कलम 8 (1) (जे) नुसार देण्यात आलेली नाही. वास्तविक परीक्षेमध्ये कोणत्या प्रश्नाला किती गुण मिळाले ही माहिती मला उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतू गोपनियतेच्या कारणास्तव ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की उत्तर पत्रिका हया गोपनिय असतात त्यावर तपासणी करणा-या परीक्षकाची नावे असतात व त्या उपलब्ध करुन दिल्यास त्याचा गैरवापर होण्याची शक्यता असते. तसेच इतरांच्या उत्तर पत्रिका उपलब्ध करुन देणे हे शक्य नसल्यामुळे तसे त्यांना कळविण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे प्रथम

अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला आहे. परंतू स्वतःची उत्तर पत्रिका ही गोपनिय नाही. मात्र परीक्षकाची नावे किंवा सहया हया प्रकट न करता उत्तर पत्रिकेची छायांकित प्रत ही अवलाकनार्थ दाखविणे संयुक्तिक राहिल. इतरांच्या उत्तर पत्रिका हया त्रयस्थ पक्षाच्या असल्यामुळे त्याच्या छायांकित प्रती देणे हे योग्य नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे जे अर्ज आहे त्यामध्ये मिळालेले गुण व आदर्श उत्तर पत्रिकेची प्रत मिळालेली दिसून येत नाही. ती त्यांनी अपीलामध्ये मागितलेली होती. आता त्यांना मिळालेल्या गुणाची माहिती दिलेली आहे. आदर्श उत्तर पत्रिकेची प्रत परीक्षा संपलेली असल्यामुळे देण्यास हरकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाची तारीख व वेळ कळवून त्यांचे कार्यालयात उपस्थित होवून त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिकेचे अवलोकन करावे. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर त्यांची उत्तरपत्रिका त्यांना अवलरेकनार्थ दाखविण्यात यावी. तसेच सोबत आदर्श उत्तर पत्रिकेची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 323/2010**

कु. वुदना प्रभाकर लांजेवार
मु. हिरापूर रोड गोरेगाव
पो. ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन मुंबई 32.
2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन मुंबई 32. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी उपसचिव शालेय शिक्षण विभाग यांचे कार्यालयामध्ये केंद्रिय प्रथ. शाळेच्या मुख्याध्यापकाच्या पदोन्नती व शैक्षणिक पात्रतेबाबद शासन निर्णय 14 नोव्हेंबर 1994 नुसार एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती साधारण टपालाद्वार घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.9.2009 रोजी अपीलकर्ता यांना केंद्र शासन शिक्षण सल्लागार समितीवर शाळा समुह केंद्राच्या मुख्याध्यापकाने सदस्य म्हणून नियुक्ती करणे केंद्र प्रमुखाची शैक्षणिक पात्रता शासन निर्णय क्र. पीआरई–1094/704/प्राशि–1 दि. 18.1.1995 अन्वये निश्चित केले आहे. चार पृष्ठाकरीता रु. 8/– पोस्टेज खर्च भरावा असे त्यांना कळविण्यात आलेले आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 18.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व कागदपत्रे कोणतीही दाखल केलेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की शासन निर्णय दि. 18.1.1995 च्या मुद्दा क्र. 5 मध्ये दर्शविल्याप्रमाणे केंद्र प्रमुख व पात्र मुख्याध्यापक अशी

दोन वेगवेगळे पद आहेत. ज्यामध्ये केंद्र प्रमुखाची शैक्षणिक पात्रतेचा उल्लेख आहे. परंतू पात्र मुख्याध्यापकाच्या शैक्षणिक पात्रतेचा उल्लेख नाही व तीच माहिती हवी आहे व ती माहिती दिलेली नाही. एकंदरीत केंद्रिय प्रथ. शाळेतील पात्र मुख्याध्यापकाची शैक्षणिक पात्रता पदवीधर (बी.ए.) असणे आवश्यक आहे किंवा नाही याची माहिती मिळाली नाही.

4. अपीलकर्तायांनी आयोगास दि. 18.1.1995 चा शासन निर्णय दाखविण्यात आला. परंतू शासन निर्णयाप्रमाणे केंद्र प्रमुख यांची अर्हता दिलेली आहे. परंतू केंद्र पात्र मुख्याध्यापक याबाबत माहिती दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 2.7.2009 च्या अर्जात तसेच प्रथम अपीलाच्या मध्ये जे स्पष्टपणे दिलेले आहे त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. दिलेली माहिती दिशाभूल करणारी व चुकीची आहे हे निश्चित दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना माहितीची आवश्यकता आहे. शास्तीची त्यांची मागणी नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 2.7.2009 च्या अर्जात तसेच दि. 18.9.2009 च्या प्रथम अपील मेमोमध्ये स्पष्टपणे मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 325/2010**

श्री व्ही. टी. पाटील
अध्यक्ष आर.टी.आय.कमिटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असा.
ऑफ इंजिनिअर्स नागपूर शाखा
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन
डरुवला कॉलनी वर्धा रोड नागपूर 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आ. बा. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव
जलसंपदा विभाग
मंत्रालय मुंबई
2) श्री प्र. प्र. गोसावी
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(सेवा)
जलसंपदा विभाग
मंत्रालय मुंबई ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैाहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(सेवा) जलसंपदा विभाग यांचेकडे श्री ब. ग्या. गोन्नाडे कार्यकारी अभियंता यांचे संदर्भात तीन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 12.1.2009 रोजी उत्तर दिलेले दिसून येते. परंतू त्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे दि. 29.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 3.3.2009 रोजी सदर धारीका मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडून परत घेण्यापूर्वीच अपील अर्ज केला असून माहिती अद्याप प्राप्त न झाल्याचे कळविले आहे. पुन्हा कळविण्यात येते की मागितलेली माहिती ही सद्या सदरीकरणात असलेल्या धारीकेत

समाविष्ट आहे. आपणास हवी असलेली माहिती नाकारण्यात आलेली नाही. अपील अर्ज विचारात घेता येणार नाही. तरी व्यक्तीशः काही प्रतीपादन करावयाचे असल्यास दि. 12.3.2009 रोजी उपस्थित व्हावे असे कळविलेले दिसून येते. परंतू त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडून नस्ती परत आल्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 28.4.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती उपलब्ध झालेली असेल व त्यामुळेच अपीलकर्ता गैरहजर राहिलेले असतील असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 324/2010**

श्री कृष्णा हेमराज कनोजिया
बुध्द नगर आनंद बुध्द विहाराजवळ
नागपूर 440017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महसुल व वन विभाग
मंत्रालय मुंबई 32
2) श्री एस. एस. गोखले
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
महसुल व वन विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव महसुल व वन विभाग यांचेकडे श्री जी.एन.खापेकर तहसीलदार आमगाव, गोंदिया यांना निलंबित केल्याचे कागदपत्रे, चार्जशीट, नोटशीट सह तसेच शासन सेवेत पुनः स्थापीत केल्याबाबतच्या नस्तीच्या टिप्पणीच्या सगळे कागदपत्रे मिळणेबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 25.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 23.3.2010 रोजी द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचा अर्ज दि. 8.2.2010 रोजी प्राप्त झाला. दि. 19.3.2010 रोजी अतिरीक्त शुल्क भरण्यास त्यांना कळविण्यात आले. दि. 5.4.2010 रोजी त्यांनी अतिरीक्त शुल्काचा भरणा केला. दि. 19.4.2010 रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 336/2010

श्री कृ. के. चांदेकर
50 दत्तात्रय नगर नागपूर
ता. जि. नागपूर 24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आय. एस. कसबे
प्रथम अपीलीय अधिकारी
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे
2) श्री एस. एम. यादव
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
28 क्वीन्स गार्डन पुणे 411001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.5.2009 रोजी जन माहिती अधिकारी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचेकडे A Compilation of historical authorities showing the koshti as a separate occupational caste distict from the Halba tribe and the koshti not being merely the name of the profession of weaving अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 27.7.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पूर्वी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

अपीलकार श्री चांदेकर यांनी ज्या पुस्तकाची प्रत मिळण्याची विनंती केली आहे ते पुस्तक नसून शासनाने हलबा/हलबी कोष्टी या जातींचा अभ्यास करण्यासाठी डॉ. फरेरा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ञ समितीने त्यांचा अहवाल तयार करण्यासाठी

पूर्व अभ्यास म्हणून तयार केलेले साहित्याचे एकत्रिकरण आहे. डॉ. फरेरा यांनी तयार केलेला अहवाल शासनास सादर केलेला आहे. त्या अहवालाची प्रत अर्जदार यांना शासनाकडून मागणी करता येईल. तथापि, सदर अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी समितीने वापरलेल्या प्राथमिक दस्तऐवज किंवा इतर कोणतेही साहित्य या कार्यालयात उपलब्ध नाही. तसे यापूर्वीही शासनास अर्जदारास तसेच मा. राज्य माहिती आयोगासही दुस–या एका प्रकरणात सादर केलेले आहे.

प्रसंगतः असेही नम्रपणे नमूद करण्यात येते की श्री चांदेकर यांनी हलबा/हलबी कोष्टी यासंबंधी आजवर या कार्यालयाकडे शासनाकडे तसेच या कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार या कायद्याअंतर्गत एकुण 19 वेळा माहितीची मागणी केलेली आहे त्या अनुषंगाने त्यांना आवश्यक असलेली माहिती 19 वेळा देण्यासाठी या कार्यालयाने प्रामाणिकपणे प्रयत्न करुन जी माहिती उपलब्ध आहे त्याची प्रत श्री चांदेकर यांना वेळोवेळी या कार्यालयाचे पत्र दि. 13.2.2006, 17.3.2006, 17.7.2006, 22.2.07, 10.11.06, 20.11.06, 4.11.06, 10.11.06, 20.11.06, 12.1.07, 18.10.07, 10.12.07, 5.1.08, 1.11.08, 14.11.08, 6.2.09, 20.2.09, 13.5.09 उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच त्याच अनुषंगाने या कार्यालयामध्ये असलेल्या गंथालयातील विविध संदर्भ ग्रंथ/पुस्तके कार्यालयीन वेळेत पाहण्याबाबतही त्यांना वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तरी श्री चांदेकर यांनी विचारणा केलेली माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने ती त्यांना उपलब्ध करुन देता आलेली नाही व देता येणे शक्य नाही. सबब सदरचे अपील कृप्या खारीज करण्यात यावे ही विनंती.

वरील खुलाशात दिलेले उत्तर योग्य आहे असे दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

**आ दे श**

1) जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 341/2010**

श्री डॉ. मुन्नावार युसुफ
म्हेंदीबाग गार्डन पो.ऑ.आंबेडकर मार्ग
बिनाकी मंगळवारी नागपूर 440017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद
पाणचक्की औरंगाबाद 431002
2) जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद
पाणचक्की औरंगाबाद 431002 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर नाहीत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचेकडे Copy of Wakf Regulations २००३ as referred in the Minutes of Wakf Board meeting dated ६-१२-२००३. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2009 रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 26.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 7.1.2010 रोजी 15 दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री ॲड. कडू यांनी युक्तीवाद केला. व आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती त्यांचेकडून उपलब्ध झाली नाही तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे एकाच कार्यालयात असतांना सुध्दा त्याच दिवशी माहिती उपलब्ध करुन न देता 15 दिवसात माहिती द्यावी असा माहिती देण्या टाळाटाळ करणारा निर्णय त्यांनी दिला. व असा युक्तीवाद केला की एकाच कार्यालयात ते उपस्थित होते. त्यामुळे मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी सुध्दा सदरच्या Regulation ची प्रत देण्यास हरकत नव्हती.

4. उत्तरवादी हजर नाहीत व त्यांचे तर्फे जी व्यक्ती हजर आहे त्या व्यक्तीच्या हजर राहण्यास अपीलकर्ता यांनी हरकत घेतली आहे. ते कोणतेही पदाधिकारी नाही व वक्फ बोर्डाचे कर्मचारी नाही व त्यांना त्याबद्यल काहीही माहिती नाही. ही त्या व्यक्तीनी सुध्दा कबूल केले. व तसेही कोणतेही

कागदपत्र दाखल केलेले नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे ते शास्तीस पात्र आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतू त्यांना संधी देवूनही ते आज हजर झालेले नाही. व त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांनी दि. 23.11.2009 च्या निर्णयात मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. ती न उपलब्ध करुन दिल्यास ते पुन्हा शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.
2) अपीलकर्ता यांच्या दि. 23.11.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही व अर्जाची सुध्दा दखल घेतली नाही या कारणास्तव त्यांचे विरुध्द रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 51/2010**

श्री डी. नंदन लोहरुका
प्लॉट नं. 62ए साई महिमा कॉलनी
चिचभवन वर्धा रोड नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) श्री सुरेश देव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (नि)(पश्चिम)
नागपूर सुधार प्रन्यास सदर स्टेशन रोड
नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2010 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 21.1.2010 रोजी अपील क्र. 1011/2009 मधील दि. 30. 11.2009 च्या निर्णयाप्रमाणे 20 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) प्रमाणे तक्रार केली आहे. सदर तक्रारीच्या संदर्भामध्ये दि. 3.3.2010 रोजी खुलासा करण्यात आला होता. सदरच्या खुलाशाप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 8.1.2010, 13.1.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे आयोगाकडे कळविण्यात आले. त्याप्रमाणे पुन्हा दि. 21.1.2010 रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना तपशीलात संपूर्ण प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व असे असून सुध्दा तक्रारदार यांनी पुन्हा तक्रार दाखल केलेली आहे. पुन्हा गैरतक्रारदार श्री डी. नंदन लोहरुका यांनी मागितलेल्या माहितीमध्ये दि. 25.2.2009 व 16.1.2010 यांना वेगवेगळी माहिती प्राप्त झाल्याचे कळविले आहे. ती माहिती नागपूर सुधार प्रन्यासच्या अभिलेखामध्ये एकत्रित उपलब्ध नसल्याने ती संकलीत केल्यावर त्यांना देण्यात आली आहे. या अभिन्यासातील अभिलेखे/धारीका हया नागपूर महानगर पालिकेकडून प्राप्त झाले असून त्यामध्ये नागपूर महानगर पालिकेकडून काही धारीकाची माहिती त्यांचेकडून पाठविण्यात आले नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामध्ये त्या पत्राद्वारे सहा. संचालक, नगर रचना, नागपूर महानगर पालिका नागपूर यांना उपरोक्त प्रकरणात काही भूखंडाच्या धारीका त्यांच्या रेकार्ड मध्ये राहील्या असल्यास त्या नागपूर सुधार प्रन्यासला पाठविण्यात यावे. तसेच यापूर्वी पाठविण्यात आलेल्या धारीकेची यादी पाठविण्याची विनंती केली आहे. नागपूर महानगर पालिकेकडून माहिती अप्राप्त आहे. वरील खुलाशावरुन व जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे दिसून येते की यामध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध असून ते

उपलब्ध करुन देत नाही असे दिसून येत नाही. महानगर पालिका व नागपूर सुधार प्रन्यास हया सार्वजनिक प्राधिकरणाची व शासनाच्या धारणाच्या संदर्भामध्ये निर्णय प्रक्रियेमधील धारीका माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध झाली आहे किंवा नाही व या प्रकरणाची व्याप्ती फार मोठी आहे. तीन लाखापर्यंत भूखंड धारक असावे व त्यामुळे संपूर्ण धारकाची स्वतंत्र एजन्सीला काम देण्यात येवून त्यांची नोंद सुरु आहे असे सांगितले. व त्यावरुन फक्त माहिती अधिकारी दोषी आहे असा निष्कर्ष काढता येत नाही व त्यांनी चुकीची माहिती दिली आहे असाही निष्कर्ष काढता येत नाही. त्यावरही गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की तक्रारदार यांना ज्या ज्या भूखंड धारकाकडून माहिती उपलब्ध होईल त्याची माहिती त्यांनी जर त्यांना आणून दिली तर ती तपासून पुढील कार्यवाही करता येईल. अन्यथा नोंदणीचे काम हे दीड वर्षापर्यंत सुरु राहील. त्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 342/2010

श्री राजहंस मन्याराम बोरकर
मु. बुधेवाडा पो. झरपडा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वाकुलकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विषेश समाज कल्याण अधिकारी
गडचिरोली ता. जि. गडचिरोली
2) श्री विजय शामरावजी समर्थ
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
अंकुर आश्रम शाळा वैरागडे
ता. आरमोरी जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे कर्मचाल्याची सेवा जेष्ठता यादी. संचमान्यतेची प्रत सन 1997–98 ते 2009 पर्यंतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 14.5.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 29.4.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ती माहिती त्यांना चुकीची उपलब्ध करुन दिली. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांना मिळालेल्या सेवा जेष्ठता यादीचे अवलोकन केले असता त्यामध्ये श्री आर.एम.बोरकर यांचे नावा पुढे कालावधी दि. 17.7.1998 ते 30.7.98 असा दिलेला आहे. तो सकृतदर्शनी युकीचा आहे. दि. 17.7.197 अपेक्षित आहे. परंतू ती लेखन चुक आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व ती लेखन चुक त्यांनी अपीलकर्ता यांना दुरुस्त करुन दिली असून ती प्रमाणित करुन दिली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 340/2010**

श्री दिगंबर नत्थु रामटेके
कुंभारे नगर पिंपरा रोड
श्री राहुल देशभ्रतार यांच्या घरासमोर तुमसर
पो. ता. तुमसर जि. भंडारा 441912 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ग. ब. रबडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ औरंगाबाद
मिलींद कॉलेज समोर छावणी पोसट बॉक्स क्र. 566
औरंगाबाद 431002
2) श्री एम. एस. पाटील
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ औरंगाबाद
मिलींद कॉलेज समोर छावणी पोसट बॉक्स क्र. 566
औरंगाबाद 431002 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.4.2010 रोजी नोटीस काढून दि. 5.5.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचेकडे दि. 1.10.1999 पासून मंजूर केलेल्या आगावू वेतनवाढ पुर्नविलोकन कार्यवाहीची माहिती माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 1.11.2010 रोजी कार्यालयात रु. 11/– चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतू तसे न करता अपीलकर्ता यांनी दि. 9.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. निरंक रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती त्यांच्या दिनांक 28.8.2006 च्या पुर्नविलोकन अर्जाचा विचार करुनच माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. दि. 18.2.2010 रोजी अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. व तशी ती दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 290/2010**

कु. मिना तुकाराम मोरखंडे
प्लॉट नं. 51 सहयोग नगर नारी रिंग रोड
पावर ग्रेड ऑफिसचे मागे नागपूर 26 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुरेश सोने
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त
परिमंडळ क्रमांक 3 नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एच. एल. डुंबरकर
जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त
लकडगंज विभाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 28.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधिकारी लकडगंज पोलीस स्टेशन नागपूर यांचेकडे दि. 13.5.1996 रोजी लकडगंज पोलीस स्टेशन नागपूर यांचेकडे श्री ईश्वर सुर्यभानजी बोलधन आणि सौ. पुष्पा ईश्वर बोलधन राह.बगडगंज भंडारा रोड नागपूर यांचेविरुध्द अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा 1989 अंतर्गत दिलेली तक्रीबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.1.2010 रोजी आपण मागितलेल्या अर्जाच्या माहिती संबंधाने सदर तक्रारीची पोलीस नियमावली भाग(2) नियम 262 अन्वये अर्ज जतन करण्याचा कालावधी 2 वर्षाचा असल्याने आपण मागितलेली माहिती कालबाहय झाल्यामुळे माहिती पुरविता येत नाही. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 14.1.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.3.2010 रोजी देण्यात आलेला असून पडताळणी केली असता असे दिसून येते की अर्जदार यांनी 13.5.1996 रोजी श्री ईश्वर सुर्यभानजी बोलधन आणि सौ. पुष्पा ईश्वर बोलधन यांचे विरुध्द पोलीस स्टेशन लकडगंज येथे रिपोर्ट दिला की सन 1986 पासून भारतीय विद्यानिकेतन बगडगंज शाळेत शिक्षिका म्हणून काम करीत होती तेथील संचालक श्री ईश्वर बोलधन यांनी तिला आजपावेतो परमनन्ट केले नाही व पगार दिला नाही. व पगार मागण्यास गेली असता गैरवर्तन केले यासंबंधाने पो.स्टे.लकडगंज येथे स्टेशन डायरी गुन्हा क्र. 41 प्रमाणे नोंद करुन एन.सी. क्र. 196 कलम 504 भादंवि प्रमाणे गैरअर्जदारास कोर्टात कारवाई करण्याची समज दिली आहे. आपण अपील अर्जात मागितलेली माहिती, माहिती अधिकारी तथा सपोओ लकडगंज विभाग व पो. स्टे.लकडगंज यांनी पुरविल्यावरुन अपीलकर्ता यांना सदरची माहिती सोबत जोडून देण्यात येत आहे

असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे वकील ॲड. नानाबाबू एस. भगत यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये जे बयाण घेतलेले आहे त्याच्या प्रती जतन करणे आवश्यक होते परंतू त्या नष्ट करण्यात आलेल्या आहेत किंवा उपलब्ध नाही असे कळविणे म्हणजे माहिती देण्याची टाळाटाळ करणे आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की अभिलेखे जतन करण्याच्या नियमाप्रमाणे अभिलेखे नष्ट केले जातात व सदरची एन.सी. असल्यामुळे त्याबाबतची कागदपत्रे जतन करण्याची आवश्यकता नसते व त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आलेले आहे. परंतू एन.सी. जरी असली तरी पोलीस स्टेशन डायरी माध्ये त्याबाबतची नोंद असेते व ती रजिस्टरे ही कायम स्वरुपी अभिलेखे असल्यामुळे तेवढी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली आहे. असे असेल तर त्यांना कागदपत्रे पाहणी करण्यासाठी उपलब्ध करुन देता येतील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशी तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून संबंधित अभिलेखाचे पाहणी करुन त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य घ्याव्या. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता हजर झाल्यावर यांना अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात यावी व माहिती उपलब्ध झाल्यास विनामुल्य छायांकित प्रती द्याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 237/2010**

श्री रमेश धनसिंग राठोड
1 के बापूनगर उमरेड रोड
नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त
विक्रीकर भवन नागपूर
2) श्री दिपक वाधमाने
जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त यांचे स्वीय सचिव
विक्रीकर भवन नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 12.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.4.2010 रोजी अपीलीय अधिका—याचे संदर्भिय पत्र दि. 9.4.2010 रोजी प्राप्त झाल्यामुळे त्यांना हवी असलेली माहिती बाबतचे अपीलकर्ता यांचे समाधान झाले आहे करीता अपील मागे घेत असल्याचे कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord६.६९३-

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 304/2010**

श्री सुरेंद्र पुंडलिकराव रेवतकर
प्लॉट नं. 345 हनुमान मंदिर मागे आय.यु.डी.पी.काटोल
ता. काटोल जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त
परिमंडळ क्रमांक 1 नागपूर
2) श्री पी. पी. धरमसीकर
जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त
सिताबर्डी विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.4.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 30.4.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी सहा. पोलीस आयुक्त सिताबर्डी नागपूर यांचेकडे केस क्र. 382/08 एफआयआर नं.एम केस1/08 सिताबर्डी पोलिस स्टेशन नागपूर अंतर्गत न्यायालयात सादर केलेल्या चार्जशिटची संपूर्ण कागदपत्राची सत्यप्रत देण्याची तसदी करावी. तसेच चार्जशिट नं. आणि केव्हा सादर केली ती दिनांक दयावी. कोण्या कोर्टाचा जामिन आणला पोलिस विभागाला सहा रिपोर्ट झाल्या त्यावर झालेली कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 14.2.2010 रोजी मागितलेल्या माहितीच्या बद्यल चार्जशिट गेलेली नसल्यामुळे कागदपत्रे देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व इतर माहिती त्यांना पुरविलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 2.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.3.2010 रोजी देण्यात आलेला असून दि. 14.2.2010 रोजी अर्जदार यांना माहिती देण्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी पत्र तयार केले. परंतू अर्जदार यांनी माहिती घेण्यास नकार दिला. तसेच त्यांचे इतर माहितीच्या संदर्भात अपील अंशतः मान्य करुन केस क्र. 382/08 मध्ये प्रथम न्यायदंडाधिकारी वर्ग पहिला कोर्ट क्र.2 एम केस दाखल करुन गुन्हयाचा तपास करण्याबाबत आदेश दिल्याने पो.स्टे.सिताबर्डी येथे एम.केस क्र.1/08 कलम 379, 176, 193, 202, 201, 203, 204, 34 भादंवि सह कलम 05 मिडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेगनेन्शी ॲक्ट 1971 प्रमाणे दाखल असून सदर एम. केस मध्ये एकुण 14 आरोपी असून एकाही आरोपीने कोर्टाची जामीन घेतलेली नाही व त्यांना सदर गुन्हयात अटक केलेली नसुन कोर्टात दोषारोपपत्र पाठविलेले नसल्याने दोषारोप नंबर नाही. दि.1.2.08 ते 31.1.10 या कालावधीत कोणत्याही आरोपीने कोर्टातून जामीन घेतलेला नाही. परंतु सदर एम.केस मध्ये झालेल्या तपासाबाबतचा अहवाल वेळोवेळी मा. प्रथम न्यायदंडाधिकारी वर्ग पहिला कोर्ट क्र.2 यांचे कोर्टात पाठविलेला आहे. ही माहिती आपणास

देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

2

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना अपेक्षित अशी माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की तपासाबद्यलची सर्व माहिती व अहवाल हा न्यायालयाकडे सादर करण्यात आलेला आहे. परंतू तो अपीलकर्ता यांनी घेण्यास नकार दिलेला आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना अपेक्षित अशी माहिती नसल्यामुळे त्यांनी तो घेण्यास नकार दिला होता. गुन्हयाचे स्वरुपात व त्याबाबतचा तपास व त्याबाबतची कार्यपध्दती जशी असे त्याप्रमाणे कार्यवाही झालेली असल्यास त्या कार्यवाहीची माहिती जशी आहे तशी उपलब्ध होवू शकेल. अपीलकर्ता यांना काय पाहिजे किंवा अपीलकर्ता यांची काय अपेक्षा आहे त्याप्रमाणे माहिती असेलच असे नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी उपलब्ध असलेली माहिती घेणे संयुक्तिक राहिल. त्याप्रमाणे त्यांनी आयोगाचे समोर उपलब्ध असलेली माहिती घेतली. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**